cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-४४ | शनिवार दि.२५ मे २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### वेध ४ जूनचे!

व्यक्ती तितक्या प्रकृती. कोणाला कशाचे वेध अथवा वेड असावे याला बंधन नाही. काही जणांना आयपीएलचा विजेता कोण याचे वेध लागले असतील, काहींना टी-२० विश्वकपचे, बळिराजाला मान्सून वेळेवर बरसतो काय याचे वेध तर अनेकांचे लोकसभा निवडणुकीचा विजेता कोण यासाठी ४ जूनकडे डोळे लागले असतील. महाराष्ट्रात मतदानाचे सर्व पाच टप्पे पार पडले आहेत. मात्र, देशात आणखी दोन टप्पे शिल्लक आहेत. पैकी सहावा टप्पा आज पार पडेल.

### विशाल अग्रवालला १४ दिवसांची कोठडी

पुणे : पुणे अपघात प्रकरणी विशाल अग्रवालला आता १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. पुणे पोलिसांनी विशाल अग्रवालची पोलिस कोठडी देण्यात यावी अशी मागणी केली होती, पण न्यायालयाने ती फेटाळली आणि १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यामुळे आता विशाल अग्रवालच्या जामीनाचा मार्ग मोकळा झाला आहे. सोमवारी जामिनासाठी अर्ज केला जाणार आहे अशी माहिती आरोपीच्या वकिलांनी दिली आहे.

# विक्रमी गहू खरेदी, २२ लाख शेतकऱ्यांना ५९ हजार कोटी मिळाले!

## केंद्र सरकारला २६२.४८ लाख मेट्रीक टन गहू बळीराजाने विकला

**नवी दिल्ली । वृतसंस्थत्ता**

**यावर्षी देशात मोठ्या प्रमाणात गव्हाची खरेदी केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार आत्तापर्यंत विक्रमी गव्हाची खरेदी झाली आहे. गहू खरेदीने मागील वर्षीचा विक्रम मोडला आहे. आत्तापर्यंत सरकारने २६२.४८ लाख मेट्रिक टन गव्हाची खरेदी केली आहे. गहू खरेदीमुळे २२.३१ लाख शेतकऱ्यांना फायदा झाला आहे. तर ५९,७१५ कोटी रुपये किमान आधारभूत किंमतीच्या रुपात शेतकऱ्यांना मिळाले आहेत.**

रब्बी विपणन हंगाम २०२४-२५ दरम्यान गव्हाची खरेदी देशभरातील प्रमुख खरेदी करणाऱ्या राज्यांमध्ये सुरळीतपणे सुरू आहे. या वर्षात आतापर्यंत २६२.४८ लाख मेट्रिक टन गहू खरेदी करण्यात आला आहे. केंद्रीय साठ्यात गेल्या वर्षी झालेल्या एकूण २६२.०२ लाख मेट्रिक टन खरेदीला मागे टाकत यावर्षी गव्हाची खरेदी झाली आहे. रब्बी विपणन हंगाम २०२४-२५ मध्ये एकूण २२.३१ लाख शेतकऱ्यांना लाभ झाला असून ५९,७१५ कोटी रुपये किमान आधारभूत किंमतीच्या रुपात प्रदान करण्यात आले आहेत. गहू खरेदीमध्ये प्रमुख योगदान



पाच राज्यांचे आहे. पंजाब, हरियाणा, मध्य प्रदेश, राजस्थान आणि उत्तर प्रदेश या राज्यांनी अनुक्रमे १२४.२६ लाख मेट्रिक टन, ७१.४९ लाख मेट्रिक टन, ४७.७८ लाख मेट्रिक टन, ९.६६ लाख मेट्रिक टन आणि ९.०७ लाख मेट्रिक टन गहू खरेदी केला आहे. पंजाब आणि हरियाणा ही दोन राज्य गहू खरेदीत आघाडीर असणारी राज्य आहेत. दरवर्षी या दोन राज्यातून मोठ्या प्रमाणात गव्हाची खरेदी होत असते. याचा मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना फायदा मिळतो.

### तांदळाचीही मोठ्या प्रमाणात खरेदी

सध्या धान खरेदीही सुरळीत सुरु आहे. खरिप विपणन हंगाम २०२३-२४ दरम्यान ४८९.१५ लाख मेट्रिक टन तांदुळाच्या समतुल्य ७२८.४२ लाख मेट्रिक टन धान आतापर्यंत ९८.२६ लाख शेतकऱ्यांकडून थेट खरेदी करण्यात आले आहे. १,६०,४७२ कोटी रुपये किमान आधारभूत किंमतीच्या रुपात प्रदान करण्यात आले आहे. उपरोक्त निर्देशित खरेदी केल्यामुळे, केंद्रीय साठ्यामध्ये सध्या गहू आणि तांदूळ यांचा एकत्रित साठा ६०० लाख मेट्रिक टनाच्या पुढे गेला आहे. यामुळे देशाला प्रधानमंत्री गरिब कल्याण अन्न योजना आणि इतर कल्याणकारी योजनांतर्गत नागरिकांच्या अन्नधान्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि बाजारातील धान्य उपलब्धतेसाठी देखील सुखावह स्थिती निर्माण झाली आहे.

## थोडक्यात...

### शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीमधील श्लोक?

पुणे : राज्य मंडळाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम आराखड्यात मनाचे श्लोक आणि भगवद्गीतेसह मनुस्मृतीतील श्लोकाचा वापर करण्यात आला आहे. मूल्य आणि स्वभाववृत्ती या शीर्षकाखाली मनुस्मृतीतील श्लोकाचा संदर्भ देण्यात आला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राज्याचा शालेय अभ्यासक्रम आराखडा एससीईआरटीनं जाहीर केला आहे. देशातील पारंपरिक, प्राचीन ज्ञानाची ओळख विद्यार्थ्यांना करुन देण्यासाठी ज्ञानप्रणाली विषयाचा समावेश करण्यात आला आहे. यात मनुस्मृतीतील श्लोकाचा संदर्भ देण्यात आला आहे.

### नागपुरातील बाजारात बॉम्ब ठेवल्याची धमकी

नागपुर- येथील सर्वात मोठी बाजारपेठ असलेल्या सीताबर्डी बाजारातील दुकानात बॉम्ब ठेवणार असल्याचा अज्ञात व्यक्तीने फोन केला आहे. फोन ११२ वर फोन करत अज्ञात व्यक्तीने ही धमकी दिली आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. पोलीस नियंत्रण कक्षाकडून माहिती मिळताच पोलीस आणि बॉम्ब शोध पथकाने घटनास्थळी रवाना झाले. सीताबर्डी बाजारातील मोदी नंबर २ आणि मोदी न ३ बाजार ओळीमध्ये बॉम्ब ठेवणार असल्याची दिली या व्यक्तीने धमकी दिली होती.

## लोकसभा निवडणुकीनंतर विधान परिषदेचा वाजला बिगुल

### शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या विधान परिषदेची निवडणूक जाहीर

**मुंबई । प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीचे महाराष्ट्रातील ५ टप्पे संपल्यानंतर आता पदवीधर निवडणुकांसंदर्भात अपडेट देण्यात आली आहे. राज्यात शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या विधान परिषदेची निवडणूक जाहीर झालीय. २६ जूनला ४ जागांसाठी मतदान होणार आहे तर १ जुलैला मतमोजणी होणार आहे. मुंबई शिक्षक, मुंबई पदवीधर, कोकण शिक्षक आणि नाशिक पदवीधर या चार जागांसाठी मतदान होणार आहे.**


आधी या ठिकाणी १० जून रोजी मतदान होणार, ही तारीख जाहीर करण्यात आली होती. दरम्यान काही दिवसांपुर्वीच या तारखा पुढे ढकलण्यात आल्याचे सांगण्यात आले. शाळांच्या उन्हाळी सुट्ट्या संपल्यानंतर ही निवडणूक घेण्यात यावी, अशी मागणी आयोगाकडे करण्यात आली होती. दरम्यान आता निवडणूक आयोगाकडून अपडेट वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. पदवीधर, शिक्षक निवडणुकीच्या तारखा जाहीर पान २ वर

## ईव्हीएमवरुन निवडणूक आयुक्तांना धमकीवजा पत्र

### खून करेल म्हणल्याने माजी मंत्र्यांविरुद्ध गुन्हा दाखल

**बुलडाणा । प्रतिनिधी**

विरोधकांनी निवडणूक आयोग हा सरकारच्या मर्जीप्रमाणे काम करत असल्याचा आरोपही अनेकदा केला. तर, मतदानानंतरही ईव्हीएम मशिन ठेवलेल्या गोदामात सीसीटीव्ही बंद असल्यावरुन काही नेत्यांनी आक्षेप घेतल्याचे पाहायला मिळाले. त्यातच, माजी मंत्री सुबोध सावजी यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांना पत्र लिहून



खळबळजनक विधान केले आहे. महाराष्ट्रातील मतदारांच्यावतीने अन्यायाच्या विरोधात मी आपला गळा घोटल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराच सावजी यांनी पत्रातून दिला आहे. यावरुन भावे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ईव्हीएम मशीनमध्ये घोटाळा करुन काही फेरबदल केला तर मी मुख्य निवडणूक आयुक्तांचा खूनही करेल असे खळबळजनक पत्र लिहून मुख्य निवडणूक आयुक्तांना सावजी पान २ वर

## बीडमध्ये उदंड जहाले लाचखोर!

### एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यास ३० हजाराची लाच घेताना रंगेहात अटक

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील एसीबी कारवाईची धडक मोहिम गेल्या आठवडाभरात चालू असल्याचे दिसून येत आहे. सर्वात आधी पोलीस दल, त्यानंतर पाटबंधारे विभाग, नगर रचनाकार आणि आता एसटी महामंडळातील अधिकाऱ्याला ३० हजाराची लाच घेताना रंगेहात पकडले आहे. ही कारवाई एसीबीच्या पथकाने शुक्रवारी केली. दोन दिवसापुर्वीच परळी आणि बीडमध्ये कारवाई केली होती. एसीबीकडून लाच घेणाऱ्यांच्या मुसक्या बांधण्यात येत असल्याचे बीड जिल्हयात उदंड जहाले लाचखोर असे म्हणण्याची वेळ आली आहे.

बीडच्या एसीबीकडे एसटी महामंडळातील वरिष्ठ अधिकारी असलेल्या दिनेश राठोड यांच्याविषयी लाच संदर्भाने तक्रार पान २ वर



## लोकसभा निकालानंतर चिअर्स..!

### हायकोर्टाकडून बार मालकांना दिलासा, ४ जून रोजी दारू विक्रीला परवानगी

**मुंबई । प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकांच्या निकालाची सर्वांनाच उत्सुकता लागली असून ४ जून रोजी जल्लोष करण्यासाठी सर्वच कार्यकर्ते सज्ज झाले आहेत. निकालाच्या दिवशी मुंबईत दारुविक्री बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले होते. मात्र, या निर्णयाविरोधात दाखल याचिकेवर आज न्यायालयात निर्णय झाला. त्यामुळे, हायकोर्टाने दारु विक्रीला निकालानंतर परवानगी दिली आहे.**



लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने सर्वच मतदारसंघात मतदानाच्या दिवशी दारुबंदीचे आदेश दिले होते. त्यामुळे, मतदान होईपर्यंत मतदारसंघातील दारुची दुकाने, बार बंद ठेवण्यात आले. शेवटच्या टप्प्यात मुंबईतील ६ लोकसभा मतदारसंघात मतदान झाले. त्यामुळे, येथील वाईन शॉप, दारु दुकाने, पब यादिवशी बंद ठेवण्यात आले होते. आता, ४ जून रोजी मतमोजणी होत असून त्यादिवशीही दारु दुकाने, वाईन शॉप व पब बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांच्याकडून देण्यात आले आहेत. याप्रकरणी, दुकानमालकांनी न्यायालयात धाव पान २ वर

## उष्णतेमुळे गव्हाचा ट्रक पेटला

**जळगाव । प्रतिनिधी**

जिल्ह्यातही सध्या उष्णतेची मोठी लाट पसरली असून या उष्णतेच्या लाटेमुळे वाहनांमध्ये आग लागण्याच्या घटना घडत आहेत. जळगाव जिल्ह्यातील जामनेर तालुक्यात भवानी माथाजवळ जळगाव-औरंगाबाद रस्त्यावर अचानक एका ट्रकने पेट घेतल्याचे दिसून आले. या ट्रकमधून गव्हाच्या पोत्यांची वाहूतक करण्यात येत होती. गव्हाच्या पोत्यांनी भरलेल्या या ट्रकला आग लागल्यामुळे उन्हाची तीव्रता लक्षात येईल. दरम्यान, या घटनेनंतर अग्निशमन दलास पाचारण करण्यात आले, मात्र अग्निशमनची बंब येईपर्यंत ट्रकचे जळून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या घटनेमुळे जिल्ह्यात पुन्हा एकदा उष्णतेची लाट आल्याचं बोललं जात आहे. त्यामुळे, नागरिकांनी दुपारच्या प्रहरात अनावश्यक घराबाहेर न पडण्याचा सल्लाही जाणकारांकडून देण्यात येत आहे.

## राजस्थानीच्या संचालकांवर गुन्हा दाखल

### ठेवीदारांची कोट्यवधींची फसवणूक

**परळी । प्रतिनिधी**

**ठेवीदारांना जादा व्याजाचे आमिष दाखवून कोट्यवधींची फसवणूक करून राजस्थानी मल्टिस्टेट सोसायटीचे चेयरमन व सर्व संचालक मंडळी यांच्यावर शहर पोलीस ठाण्यात अखेर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तहसील प्रशासनास निवेदन, पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यासाठी ठिय्या आणि दाखल झालेल्या गुन्ह्यासाठी ठेवीदार ठाण्यात ठाण मांडून बसले होते.**




मागील ३ वर्षांपासून राजस्थानी मल्टिस्टेट सोसायटी मार्फत ठेवीदारांना आकर्षक व्याज देण्याचे आमिष दाखवत परळी शहरातील ठेवीदारांनी कोट्यवधीची रक्कम गुंतवणूक केली.१४२ ठेवीदारांनी तब्बल ७ कोटी ५३ लाख २९ हजार रुपये एवढे मल्टिस्टेट मध्ये गुंतवणूक केली मात्र मुदतीनंतर ठेवीदारांना साधा एक रुपया पण परत मिळाला नाही.यामुळे ठेवीदार आपल्या श्रमाचा पैसा मिळविण्यासाठी आक्रमक झाले.अखेर शेवटी परळी शहर पोलीस ठाण्यात राजस्थानी मल्टिस्टेटने कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी सोसायटी पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२४ मे २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : १६.०० क्विंटल | २,००० | २,३४० | २,१९३ |
| ज्वारी/हायब्रिड : २४०.०० क्विंटल | १,७०० | ४,००० | २,४४९ |
| मूग : १.५० क्विंटल | ५,००१ | ७,१०० | ६,०५० |
| तूर : २१.०० क्विंटल | ८,००० | ११,८०० | १०,७९१ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,००० | ४,००० | ४,००० |
| बाजरी: ६०.५० क्विंटल | १,७५१ | ३,३०० | २,५५३ |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन:१५९.५० क्विंटल | ४,५१९ | ४,५७० | ४,५४६ |
| हरभरा: ३.५० क्विंटल | ४,५०० | ६,१०० | ५,१६६ |

# इंग्रजी भाषा शिकवण्याची जगातील बाजारपेठ १२९.५ अब्ज डोलर्सपर्यंत जाणार!

## पुढच्या पाच वर्षात जीडीपीच्या दरापेक्षाही जास्त वेगाने होणार वाढ

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**इंग्रजी म्हणजे वाघिणीचे दूध असल्याचे म्हटले जाते. ज्याला इंग्रजी भाषा येते त्याला जगाशी सहज संवाद साधता येतो. त्यामुळेच ज्यांची मातृभाषा इंग्रजी नाही अशा देशातल्या नागरिकांचा इंग्रजी शिकण्याकडे मोठा ओढा असल्याचे दिसत आहे. भारतातील युवकांमध्येही इंग्रजी शिकण्याची ओढ असल्याचे दिसून येत आहे.**




इंग्रजी भाषा शिकण्याची बाजारपेठ जगभरात झपाट्याने वाढत आहे. या बाजाराचा आकार २०२२ मध्ये सुमारे ७२.५ अब्ज डॉलर्स इतका होता. ही बाजारपेढ २०३० पर्यंत सुमारे १२९.३ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. म्हणजेच २०२३ ते २०३० दरम्यान दरवर्षी सुमारे ७.५ टक्के दराने या बाजारपेठेत वाढ होण्याची अपेक्षा आहे. या आकडेवारीवरून असे दिसून येते की जगभरात इंग्रजी शिकण्याची मागणी वाढत आहे. लोक वेगवेगळ्या प्रकारे इंग्रजी शिकत आहेत. डिजिटल शिक्षण अधिक लोकप्रिय होत आहे कारण लोक मोबाइल ॲप्स, ऑनलाइन कोर्स आणि व्हिडिओंद्वारे सहजपणे इंग्रजी शिकू शकतात. इंग्लिश लँग्वेज ट्रेनिंग प्रोग्राम अशा लोकांसाठी डिझाइन केले आहेत जे यापूर्वी कधीही इंग्रजी बोलले नाहीत. पान २ वर

### जगभरात किती लोक इंग्रजी बोलतात?

जर्मन कंपनीच्या मते, २०२१ मध्ये जगभरात सुमारे १.३५ अब्ज लोक इंग्रजी बोलत होते. लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे जगाची एकूण लोकसंख्या सुमारे ७.८ अब्ज आहे. यापैकी सुमारे ३६ कोटी लोक आहेत ज्यांची मूळ भाषा इंग्रजी आहे. युरोपमध्ये सुमारे २१२ दशलक्ष लोक इंग्रजी बोलतात, तर भारतात ही संख्या सुमारे २६५ दशलक्ष आहे. अमेरिकेत राहणारे सुमारे ३५ कोटी लोक इंग्रजी बोलतात. एकट्या अमेरिकेत सुमारे २९७ दशलक्ष लोक आहेत ज्यांची मूळ भाषा इंग्रजी आहे आणि कॅनडामध्ये सुमारे ३० दशलक्ष लोक इंग्रजी बोलतात.

### जगात इंग्रजी शिकण्याची सर्वाधिक मागणी कुठे?

येत्या काही वर्षात आशिया पॅसिफिक प्रदेशात इंग्रजी शिकणाऱ्या लोकांची संख्या सर्वाधिक वाढेल असा विश्वास आहे. यामध्ये नोकरी करणारे लोक, महाविद्यालयीन विद्यार्थी, शाळेत जाणारी मुले आणि परदेशात जाण्याची तयारी करणारे किंवा परदेशी परीक्षेसाठी परीक्षा देणारे लोक यांचा समावेश आहे.

### भारतात इंग्रजी भाषा शिकण्याचाकल काय?

भारतातील भाषा शिकण्याची बाजारपेठ सतत बदलत असते. या बदलात तंत्रज्ञानाचा मोठा वाटा आहे. ई-लर्निंग प्लॅटफॉर्म, व्हर्च्युअल रिॲलिटी (व्हीआर) आणि सिम्युलेशन यासारख्या तंत्रज्ञानाचा वापर भाषा शिकण्याची पद्धत पूर्णपणे बदलत आहे. व्हर्च्युअल रिॲलिटी भाषा शिकण्याचा एक नवीन आणि रोमांचक मार्ग आहे.

### इंग्रजी शिकण्याचे मार्केट का वाढत आहे?

*आजकाल व्यवसाय आणि कार्यालयांमध्ये इंग्रजी ही एक सामान्य भाषा बनली आहे. इंग्रजी ही जगातील दुसरी सर्वात जास्त बोलली जाणारी भाषा आहे आणि ती सर्वात जास्त वापरली जाणारी अधिकृत भाषा देखील आहे. जरी जगातील बहुतेक लोक चीनी आणि स्पॅनिश बोलत असले तरी व्यवसाय आणि व्यापारासाठी इंग्रजीला सर्वाधिक प्राधान्य दिले जाते. त्यामुळे आजकाल कोणत्याही करिअरमध्ये यश मिळवण्यासाठी चांगले इंग्रजी येणे खूप गरजेचे आहे. त्यामुळे करिअरच्या प्रगतीचा मार्ग मोकळा होतो. अनेक कंपन्या आता परदेशातूनही कर्मचारी घेतात. अशा परिस्थितीत जर तुम्ही चांगले इंग्रजी बोलता तर तुम्हाला परदेशी कंपन्यांमध्येही काम करण्याची संधी मिळू शकते. ऑफिसमध्ये काम करताना किंवा मुलाखतीदरम्यान चांगले संवाद कौशल्य खूप महत्त्वाचे असते. इंग्रजी शिकून तुम्ही स्वत:ला इतरांसमोर प्रभावीपणे मांडू शकता.*

cmyk

## अग्रलेख

# वेध ४ जूनचे!

व्यक्ती तितक्या प्रकृती. कोणाला कशाचे वेध अथवा वेड असावे याला बंधन नाही. काही जणांना आयपीएलचा विजेता कोण याचे वेध लागले असतील, काहींना टी-२० विश्वकपचे, बळिराजाला मान्सून वेळेवर बरसतो काय याचे वेध तर अनेकांचे लोकसभा निवडणुकीचा विजेता कोण यासाठी ४ जूनकडे डोळे लागले असतील. महाराष्ट्रात मतदानाचे सर्व पाच टप्पे पार पडले आहेत. मात्र, देशात आणखी दोन टप्पे शिल्लक आहेत. पैकी सहावा टप्पा आज पार पडेल. मतदान संपल्यानंतर, परीक्षा झाल्यानंतर निकाल काय लागतो याची उत्सुकता सा-यांनाच असते. मतदानपूर्व आणि मतदानोत्तर सर्व्हे करून निकालाचा अंदाज वर्तवण्याची काहींना घाई झालेली असते. शिजजेपर्यंत दम धरला जातो पण निवजेपर्यंत नाही असे म्हणतात तेच खरे! तीन राज्यांत भाजपला फटका बसेल असा अंदाज भाजपच्या सर्वेक्षणातून पुढे आला आहे. भाजप नेत्यांचा अहवाल आणि मूल्यांकनानुसार पूर्व भारतात पक्षाची कामगिरी अपेक्षेपेक्षा चांगली राहिली आहे.

पश्चिम बंगाल, ओडिशा, आसाम आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये भाजपला फायदा होईल तर महाराष्ट्र, कर्नाटक, हरियाणात पक्षाला फटका बसेल. या राज्यांत होणा-या नुकसानीची भरपाई पश्चिम बंगाल, ओडिशा, उत्तर प्रदेश, तेलंगणामधून होईल अशी चर्चा आहे. लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीचे पाच टप्पे पार पडले असून आणखी दोन टप्पे पूर्ण झाल्यानंतर निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईल. ४ जून रोजी मतमोजणी केली जाईल. मतदारांनी यावेळी कोणाला कौल दिला ते प्रत्यक्ष मतमोजणीनंतरच समोर येईल. परंतु त्या आधी देशात ४ जूननंतर काय होईल याच्या चर्चा रंगू लागल्या आहेत. राजकीय विश्लेषकही आपली मते व्यक्त करीत आहेत. प्रत्येकजण आपल्या पातळीवर आणि भूमिकेनुसार भाकित व्यक्त करीत आहेत. राजकीय विश्लेषक आणि रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडी 'चारसौ पार'चे उद्दिष्ट गाठू शकणार नसली तरी नरेंद्र मोदी तिस-यांदा पंतप्रधान होतील असे भाकित व्यक्त केले आहे. एनडीएचे नेते मात्र चारशे पारचे टार्गेट पूर्ण करू, असा विश्वास व्यक्त करत आहेत. याआधीही देशात लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने सत्तांतरे झाली आहेत. अटल बिहारी वाजपेयी यांनी पाच वर्षांची कारकीर्द पूर्ण केली तेव्हा 'इंडिया शायनिंग'ची मोहीम राबविण्यात आली होती परंतु ती अपयशी ठरली होती.

देशात दीर्घकाळ सत्तेवर असलेल्या काँग्रेस पक्षाला सुद्धा मतदारांचे अंदाज न आल्यामुळे सत्तांतराचा सामना करावा लागला होता. यावेळी सत्ताधारी आघाडी चारशेपेक्षा जास्त जागा मिळवेल की नाही याबाबत उत्सुकता आहे. लोकसभेच्या २८० जागा मिळवणारा पक्ष सत्तेवर येऊ शकत असल्यामुळे भाजपला चारशेचे लक्ष्य गाठण्यात अपयश आले तरी तो नक्कीच तीनशे जागा मिळवेल याची खात्री असल्याने सत्ता त्यांचीच येणार असा अंदाज वर्तवला जात आहे. ४ जूननंतर नवीन सरकार सत्तेवर आल्यानंतर त्या सरकारचा रोड मॅप काय असेल याबाबतच्या सूचनाही नरेंद्र मोदी यांनी आधीच अधिका-यांना दिल्या असल्याची चर्चा आहे. ४ जूननंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींना झोळी घेऊन जावे लागेल हे विरोधी नेत्यांचे वक्तव्य व्यासपीठ गाजविण्यासाठी आणि टाळ्या मिळवण्यासाठी ठीक आहे. परंतु त्यांनाही वस्तुस्थितीची जाणीव असेलच. नरेंद्र मोदी यांनी राहुल गांधींवर टीका करताना काँग्रेसला राहुल गांधी यांच्या वयापेक्षाही कमी जागा मिळतील अशी टीका करणे सर्वस्वी चुकीचेच आहे.

कारण देशातील मतदारांनी नक्की काय निश्चित केले आहे ते ४ जूननंतरच समजणार आहे. १ जून रोजी मतदानाचा शेवटचा टप्पा पूर्ण झाल्यानंतर विविध वृत्तवाहिन्या एक्झिट पोलचे निष्कर्ष जाहीर करतील. अर्थात ओपिनियन पोल असो वा एक्झिट पोल मतदार मतदानाविषयी खरी माहिती देईलच असे नाही, मात्र, मतदारांनी दिलेल्या कौलाचे साधारण चित्र समजू शकते. विविध पक्षांची नेतेमंडळी विजय 'आपलाच' असल्याचे सांगत आहेत. इंडिया आघाडीचे ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन खरगे देशात भाजपला जनतेने नाकारल्याचे ठासून सांगत आहेत. नरेंद्र मोदी आणि अमित शहासुद्धा भाजपच्या विजयाची हमी देत आहेत. या पार्श्वभूमीवर अमेरिकेतील राजकीय जाणकार आणि अभ्यासक इयान ब्रेमर यांनी आपला अंदाज व्यक्त केला आहे. त्यांनी भाजपला नेमक्या किती जागा मिळतील तेही सांगितले आहे. त्यांनी भाजपला ३०५ जागा मिळतील असे म्हटले आहे. यात १० जागा कमी-जास्त होऊ शकतात. नरेंद्र मोदी तिस-यांदा पंतप्रधान होतील असेही त्यांनी म्हटले आहे. लोकसभा निवडणुकीचे पाच टप्पे पूर्ण झाल्यानंतर काही निष्कर्ष समोर आले आहेत ते असे- २०१४ च्या निवडणुकीत काँग्रेसविरोधी लाट होती.

२०१९ च्या निवडणुकीत पुलवामाचा हल्ला आणि त्याला बालाकोटमध्ये दिलेल्या उत्तरामुळे देशप्रेमाची लाट होती. यंदाच्या निवडणुकीत तशी कोणतीही लाट नाही. मतदारांमध्ये नैराश्य दाटले आहे, त्यामुळे मतदान कमी झाले आहे. मोदी यांच्या दहा वर्षांच्या कारभारामुळे 'अ‍ॅन्टी इन्कम्बन्सी'चा फटका बसणार आहे. तो बसू नये म्हणून भाजपने अन्य पक्षांमध्ये फूट पाडून अनेकजणांना पक्षात घेतले आहे. लोकसभेची आतापर्यंतची निवडणूक आक्रमक सत्ताधारी आणि बचावाच्या पवित्र्यातील विरोधक अशीच झाली. यात कोण बरोबर, कोण चूक हा संशोधनाचा भाग आहे. देशात अनेक मूलभूत प्रश्न आहेत. कांदा निर्यात, किमान हमीभाव, महागाई, बेरोजगारी असे अनेक मुद्दे आहेत. भाजपला या मुद्यांवर चर्चाच होऊ द्यायची नव्हती. राहुल गांधी भाजपला याच मुद्यांवर आणण्याचा प्रयत्न करत होते. आज देशात महागाई आहे, बेरोजगारी आहे, भ्रष्टाचार आहे परंतु सत्ताबदल घडवेल इतका राग, संताप जनतेच्या मनात आहे असे वाटत नाही. अर्थात हा राग, संताप मतपेटीत बंद झाला असेल तर माहीत नाही. त्यासाठी ४ जूनचीच वाट पहावी लागेल.

# स्किझोफ्रेनिया एक मानसिक आजार

## २४ मे जागतिक स्किझोफ्रेनिया दिवस या निमित्त सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांचा माहितीप्रधान लेख वाचकांसाठी देत आहोत

२४ मे जागतीक स्किझोफ्रेनिया दिवस, यानिमित्त या मानसिक आजाराविषयी थोडी माहिती देण्याचा प्रयत्न. एकंदरच मानसिक आजाराबाबत शंका कुशंका आणि गैरसमज जास्त प्रमाणात आहेत. पाश्चिमात्य राष्ट्रांच्या तुलनेत भारतात तर हे प्रमाण जास्त आहे. सामाजिक न्यूनगंडामुळे मानसिक आजार लपविण्याकडे लोकांचा जास्त कल असतो. परंतु, मानसिक आजार जितके झाकून ठेवायचा प्रयत्न होतात. त्याची परिणीती एकतर त्या मानसिक रूग्णाची आत्महत्या किंवा त्याच्याकडून एखादी हिंसक घटना घडणे यामध्येच जास्त प्रमाणात होते. त्यामुळे या आजाराबाबत अधिक संभ्रम वा शंका बाळगण्यापेक्षा मानसिक आजारांचा मानसिक तज्ज्ञांकडून उपचार करून घेणे हेच त्या रुग्णाच्या वा त्याच्या कुटुंबियांच्या दृष्टीने फायदेशीर आहे. स्किझोफ्रेनिआ अवस्थेबद्दल कमी माहिती उपलब्ध आहे. ही अवस्था अतिशय घाबरवणारी आहे, आणि याबद्दलची बरीचशी महिती चुकीची आहे. या बौद्धिक अवस्थेत एखाद्या व्यक्तीची आकलनशक्ती विकृत होते आणि तिच्या वास्तविकतेच्या संकल्पना विकृत होतात. स्किझोफ्रेनिआचे परिणाम गंभीरआहेत. त्याने पीडित लोकांचे जीवनमान कमी असते, ज्यामुळे स्किझोफ्रेनिआ ही एक गंभीर स्वास्थ्य समस्या ठरते आहे. स्किझोफ्रेनिआच्या लक्षणांमध्ये असमंजसपणा, भ्रामकता, गोंधळाची वर्तणूक आणि अनिष्ट सामाजिक संवाद यांचा समावेश होतो. स्किझोफ्रेनिआची अचूक कारणे शोधण्यासाठीची संशोधने अद्याप सुरू आहेत. आजाराच्या कौटुंबिक पूर्वेतिहासामुळे एखाद्या व्यक्तीलादेखील सतत स्किझोफ्रेनिआची जोखिम असते. उपचारांमध्ये, औषधोपचार व दीर्घकाळ उपचार, सोबतच मित्र आणि कुटुंबातील सदस्यांचे सततचे सहकार्य व आधार समाविष्ट आहे. तथापि, गर्भधारनेदरम्यान कधी-कधी गुंतागुंती होऊ शकतात. स्किझोफ्रेनिआच्या व्यवस्थापनात सामाजिक सहभाग आवश्यक असतो. ज्यामुळे स्किझोफ्रेनिआतून मुक्त होणारे लोक सक्षम आणि समाधानी जीवन जगू शकतात. अवस्थेच्या पुनरावृत्तीची शक्यता तुलनेने जास्त असते. स्किझोफ्रेनिआ पीडित व्यक्ती सोबत अधिक सकारात्मक संवाद ठेवावा,धुंदी आणणाऱ्या औषधांना व धूम्रपानास दूर ठेवावे आणि व्यावसायिक सहाय्याची तरतुद करावी, जेणेकरून त्यांना स्वतंत्रपणे आणि जबाबदारीने जीवन जगण्यास मदत होते.

**छिन्नमनस्कता (स्किझोफ्रेनिया) ची लक्षणे**

स्किझोफ्रेनिआची भिन्न लक्षणे आहेत आणि बौद्धिक आजार असल्यामुळे, दोन भिन्न प्रकरणांतील साम्याचा शोध घेणे कठीण आहे. तथापि, काही लक्षणे या अवस्थेत सामान्य आहेत. यापैकी काही लक्षणे - किशोरवयीन मुलांमध्ये स्किझोफ्रेनिआ असलेल्या किशोरांना, त्यांच्या किशोर समवयस्कांमध्ये दिसतो तो समंजसपणा असण्याची शक्यता कमी असते आणि संभ्रमीत होण्याची प्रवृत्ती अधिक असते. या मुलांमध्ये चिडचिडेपणा असतो, प्रेरणेची कमतरता असते, झोपेच्या समस्या असतात. तसेच यांना मित्रांकडून व कुटुंबातून ते बाहेर काढले जाण्याची शक्यता असते व हे शाळेत वाईट कामगिरी करतात असे दिसून आले आहे. प्रौढांमध्ये असमंजसपणाची अवस्था अतिशय व्यापक आहे. वास्तविकतेचा आधार नसलेल्या गोष्टींवर विश्वास ठेवणे, भास होणे, याचादेखील समावेश होतो. यांना, आपल्यावर कुणी प्रेम करीत नसल्याची, आपली छळवणूक होत असल्याची, किंवा आपल्या विरोधात कुणी कटकारस्थान रचत असल्याची भावना असणे यासारखे काही समज सामान्यपणे असतात. आपल्यावर कुणीतरी लक्ष ठेवत आहे, आपल्याला कुणीतरी मारणार आहे, आपल्या मनातील विचार कुणीतरी काढून घेत आहे, आपल्या मनामध्ये कुणीतरी विचार बाहेरून टाकत आहे, आपल्यावर उपग्रहाद्वारे, दुर्बिणीद्वारे, कॅमेऱ्याद्वारे लक्ष ठेवत आहेत. आपला कुणीतरी विशिष्ट वाईट हेतूने अथवा इजा पोचविण्यासाठी पाठलाग करत आहे. आपल्या शरीरातील अवयव काढून घेतले आहेत, डोक्यात चिप बसवून त्याद्वारे आपल्यावर नियंत्रण ठेवले जात आहे असे विविध भ्रम या रूग्णामध्ये असू शकतात. संभ्रम हे स्किझोफ्रेनिआचे वैशिष्ट्य आहे. काही तरी अस्तित्वात नसलेले संवेदनात्मक अनुभव येणे म्हणजे संभ्रमितपणा होय. संभ्रमित अवस्था अनेक प्रकारची असू शकते. परंतु, नसलेला आवाज ऐकायला येणे ब-याचदा अनुभवास येते. स्किझोफ्रेनिआ असलेल्या लोकांमध्ये तुटक संवादाचे भिन्न प्रकार दिसतात. त्यांत प्रश्नांची अप्रासंगिक उत्तरे देणे, बोलताना चुकीचे उच्चार करणे आणि संरचना नसलेली किंवा अर्थ नसलेली वाक्ये वापरणे यांचा समावेश होतो. गबाळ वर्तनासोबत अप्रगत बालपणा असणे, अचानकपणे स्फोटक क्रोध आणि उत्तेजना येणे, सुचना घेण्यास व पालन करण्यास विरोध करणे, भरपूर आणि निरर्थक हालचाली करणे आणि अयोग्य शारिरीक ढब ठेवणे यांचा समावेश असू शकते. सामान्य क्रियांमधील स्वारस्य कमी होणे, ज्यांत लोकांशी संवाद साधणे, वैयक्तिक स्वच्छता राखणे, भावनिकरित्या अभिव्यक्त होणे आणि आनंद मिळवणे यांचा समावेश आहे. स्किझोफ्रेनिआचा उपचार हा समस्येच्या स्तरांवर विचार करून अनेक मार्गांनी करता येतो. उपचार पद्धतींमध्ये समाविष्ट आहे

**औषधोपचार :**

आजाराच्या परिणामी दिसून येणारी लक्षणे हाताळणे आणि व्यवस्थापित करणे हे उपचारांचे पहिले आणि महत्त्वाचे चरण आहे. सर्वसाधारणपणे सुचवलेल्या उपायामध्ये, एंटीस्कायोटिक औषधे निर्धारित करणे समाविष्ट आहे. विविध घटकांच्या आधारावर, प्रथम किंवा द्वितीय - पिढीतील एंटीसाइकोटिक औषधे निर्धारित केली जाऊ शकतात. सद्य अवस्थेसाठी अनुकूल असलेली पद्धती आणि मात्रा सूचित केली जाते. रूग्णाची संवेदनशीलता लक्षात ठेवून आणि अशा औषधांचे दुष्परिणाम लक्षात घेऊन अधिक दृढ दृष्टीकोन ठेवला जातो. प्रथम चरणातील रूग्णांसाठी, विकृती परतून आलेल्या रूग्णांसाठी आणि आजारातून मुक्ततेच्या मार्गावर असलेल्या लोकांसाठी भिन्न औषधोपचार आहेत. ज्यांनी औषधांना कोणताही प्रतिसाद दिला नाही त्यांच्यासाठी सुधारित उपचार आहेत. व्यक्ती पोटातून औषधे घ्यायला इच्छुक नसल्यास लसीकरण वापरले जाऊ शकते. काही प्रकरणांमधे, इस्पितळात दाखल करणे देखील आवश्यक होऊ शकते. धूम्रपानासारख्या समस्यांसाठी एकाच वेळी वैद्यकीय उपचार सुरू केला जाऊ शकतो.

**इतर उपचार :**

औषधांच्या मर्यादित किंवा प्रतिकूल परिस्थितीच्या बाबतीत, विजेच्या झटक्यांच्या उपचारांचा सल्ला दिला जाऊ शकतो. संभ्रमाचा अनुभव होत असलेल्या लोकांमध्ये, मेंदूच्या काही भागांत चुंबकीय पद्धतीने उत्तेजना तयार करणे उपयुक्त ठरू शकते.

**मानसिक - सामाजिक सेवा :**

हे सहसा औषधोपचारांसह एकाच वेळी केले जाते आणि अत्यंत उपयुक्त आहे. एकाच वेळी अनेक घटकांवर कार्य केले जाऊन व्यक्ती संमिलीत समाजीक जीवन जगू शकतील याची सुनिश्चिती करणे हा या उपचारांचा उद्देश आहे.

संज्ञानात्मक वर्तणूक उपचार मनस्थिती समजून घेण्यासाठी आणि लक्षणांवर काम करण्यासाठी सहा महिने देखरेख केली जाते व त्यावरून योग्य धोरण वा प्रतीकार योजना तयार करावी असा सल्ला दिला जातो.

**मद्यपान आणि धुंदीच्या पदार्थांचा गैरवापर :**

या दोन्ही समस्यांचे निराकरण झाले आहे हे सुनिश्चित केले जावे आणि व्यक्ती परत्वे या व्यसनांमध्ये पडत नाही. याची काळजी घेतली जावी. यामुळे तणाव सांभाळणे, प्रेरणा वाढवणे आणि वर्तणूक योग्य करण्यात देखील मदत होते. प्रतीके व आर्थिक व्यक्तिमत्त्वाच्या अवांछित वर्तणूकींवर मर्यादा घालण्यासाठी असे अनेक प्रकारचे उपचार आहेत, या प्रकारात प्रदर्शित अनुकूल वर्तनासाठी आणि सामाजिक कौशल्यांसाठी पुरस्कार देणे यावर भर दिला जातो.

**कौशल्ये प्रशिक्षण :**

हा उपक्रम स्किझोफ्रेनिआ असलेल्या लोकांची सामाजिक कौशल्ये विकसित करून त्यांना समाजाचा भाग म्हणून मान्यता मिळवून देतो वा त्यांना कार्यक्षम बनवतो.

**रोजगार आधार :**

या अवस्थेतील लोकांच्या गरजा आणि व्यावसायिक कौशल्य संच ओळखून त्यांना अधिक स्वावलंबी बनविण्यासाठी ही सेवा प्रयत्न करते. व्यवसायात, त्यावर आधारीत सुविधा पुरविल्या जातात.

**कौटुंबिक सेवा :**

स्किझोफ्रेनिआ असलेल्या लोकांना हाताळताना परिवाराचा सहभाग अत्यंत मोलाचा ठरतो. स्किझोफ्रेनिआ असलेल्या त्या व्यक्तिंमधील पुनरावृत्ती कमी आहेत ज्यात औषधोपचारांसह कुटुंबाचा सहभाग व निरंतर कौटुंबिक संबंध यांचा समावेश आहे.

**जीवनशैली व्यवस्थापन :**

उपचारांसोबतच स्किझोफ्रेनिआला जीवनभर सेवेची आवश्यकता असते. जेणेकरून ती व्यक्ती परिस्थिती सोबत जुळवून घेऊन, अडचणींचा प्रतिकार करून, कार्यक्षम जीवन जगण्यासाठी सक्षम होऊ शकेल. स्किझोफ्रेनिआला लढा देत असलेल्या व्यक्तिला कुटुंबाचा वा मित्रांचा आधार सर्वोच्च महत्वाचा आहे. स्किझोफ्रेनिआ असलेल्या व्यक्तिंना सांभाळताना घेतल्या जाव्या असल्या महत्वाच्या गोष्टींमध्ये समावेश आहे:

**पुनरावृत्ती टाळा :**

स्किझोफ्रेनिआची पुनरावृत्ती टाळण्यासाठी बरेच काही करायचे असते. या प्रक्रियेतील सर्वात महत्वाच्या घटकांमध्ये औषधांचे नियमित सेवन, परतून येऊ पाहत असलेल्या छोट्या लक्षणावर बारीक लक्ष, आधारव्यवस्था असलेल्या कुटुंबाच्या व मित्रांच्या सतत संपर्कात राहणे हे समाविष्ट आहे. समुपदेशन आणि सामाजिक हस्तक्षेप यामुळे भावनिक शक्तीची बांधणी होऊ शकते आणि ज्या समायोजन समस्यांना तोंड द्यावे लागू शकते. त्याचे निराकरण होऊ शकते. उपचार संपूर्ण झाल्यानंतर ही या उपक्रमांमध्ये गुंतून राहणे उपयुक्त आहे. त्यामुळे पुनरावृत्तीच्या घटना लक्षणीयरित्या कमी होतात. सुदृढ जीवनशैली अंगीकारा हे सुदृढता सुधारण्यास मदत करते, स्वास्थ्य उत्तम ठेवते, आणि मनोविकार रोधक औषधे घेतल्याने दुष्परिणाम म्हणून येणाऱ्या लठ्ठपणाला कमी करण्यास देखिल मदत करते.

**धूम्रपान आणि मद्यपान टाळणे :**

स्किझोफ्रेनिआपीडित व्यक्ती मध्ये अतिप्रमाणात प्रतिबंधित औषधे वापरणे, धुम्रपान करणे आणि मद्यपान करणे याकडे अधिक कल असतो. सुदृढ वातावरण निर्मिती केल्यास मुक्ती मिळवण्यास मदत होते. यामुळे स्किझोफ्रेनिआ बाधित व्यक्ती निर्मळ राहतात आणि पुनरावृत्ती टाळता येते. छिन्नमनस्कता अर्थात स्किझोफ्रेनिया हा आजार जसा मधुमेह अथवा डायबेटीस या आजारासारखाच आहे. यावर उपचार केल्यास हा आजार इतर आजारांप्रमाणेच पूर्णपणे नियंत्रणात राहू शकतो. त्यामुळे या आजारावर उपचार करून या रूग्णांना सन्मानाचे जीवन आपण देऊ शकतो.



**डॉ.राजेश इंगोले**
सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ
अंबाजोगाई (जि.बीड.)
मो.९४२२२४०७१०

## श्री बंकटस्वामी महाविद्यालयाचा शंभर टक्के निकाल

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक २१ मे २०२४ रोजी उच्च माध्यमिक बोर्ड इयत्ता बारावीचा निकाल जाहीर झाला यामध्ये येथील श्री बंकट स्वामी महाविद्यालयाने यावर्षीही उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली फेब्रुवारी/मार्च २०२४ मध्ये पार पडलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत कनिष्ठ विभागाने घवघवीत यश संपादन केले बारावी विज्ञान शाखेचा निकाल १००% वाणिज्य शाखेचा १००% तर कला शाखेचा ८७.१७% तर व्यवसाय अभ्यासक्रम शाखेचा ८३.६३% निकाल लागला विज्ञान शाखेतून प्रथम क्रमांक कुमारी देवश्री समीक्षा संतोष ९१.६७% द्वितीय क्रमांक गवळी हर्षवर्धन हनुमंत ८७.८३% तृतीय क्रमांक शेंडगे विठ्ठल दिलीपराव व मुंजे आदित्य काकासाहेब ८७.१७% तसेच कला शाखेतून प्रथम क्रमांक कुमारी गायके वैष्णवी विलास ७७.५०% द्वितीय क्रमांक सदरे स्वप्निल संतोष ७६.६७% तृतीय क्रमांक कुमारी कुठे श्रद्धा कानिफनाथ ७६.३३% वाणिज्य शाखेतून प्रथम क्रमांक घोटाळे आदित्य अशोक ८४.३३% द्वितीय क्रमांक कर्पे आकांक्षा अंकुश ८३% तृतीय क्रमांक कुमारी भोसले ज्ञानेश्वरी आसाराम ८१.५०% तर व्यवसाय अभ्यासक्रम वोकेशनल शाखेतून प्रथम क्रमांक शेदवाड श्रीनाथ विठ्ठल द्वितीय क्रमांक चव्हाण शालिनी भागवत तृतीय क्रमांक कुमारी बागवान बुशरा मोमीन तसेच संस्कृत विषयात पाच विद्यार्थ्यांना शंभर पैकी १०० गुण संपादन केले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य मिरगणे उपप्राचार्य डॉ शिवाजी मोरे तसेच कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा ब्रम्हनाथ मेंगडे तसेच प्रशासकीय कर्मचारी प्राध्यापक शिक्षक या सर्वांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## एमएस क्लासेस म्हणजे विद्यार्थी घडविण्याचे केंद्र-प्रा.श्रीनिवास काकडे

**वडवणी । प्रतिनिधी**

**वडवणी सारख्या ग्रामीण भागात विद्यार्थ्यांमध्ये उच्च गुणवत्ता निर्माण करणारे एम एस कोचिंग क्लासेस म्हणजे विद्यार्थी घडविणारे केंद्र आहे असे मत प्रा.श्रीनिवास काकडे यांनी बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी व्यक्त केले.**

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या एच एस सी बोर्ड परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे यामध्ये एम एस कोचिंग क्लासेस वडवणीच्या विद्यार्थ्यांनी बायोलॉजी. फिजिक्स मॅथ आणि केमिस्ट्री या विषयांमध्ये१०० पैकी ९९ पर्यंत गुण मिळवून भरघोस यश मिळवले ९५ ते ९९या दरम्यान गुण मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते एम एस कोचिंग क्लासेसचीी विद्यार्थिनी मुंडे लक्ष्मी मॅथ विषयात १०० पैकी ९९ गुण मिळवले .बायोलॉजी याविषयात१०० पैकी ९७ गुण मिळवले.अविनाश मस्के मॅथ ९८.सवाल के प्रीती ९६.सावंत भाग्यश्री ९६ व यादव श्याम बाला बायलॉजी ९५.विवेक होंडे बायलॉजी ९४असे भरघोस गुण मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला या विद्यार्थ्यांना प्रा. सावंत सर.प्रा. गवारे सर प्रा. मरळकर सर प्रा. मुंडे सर यांचे मार्गदर्शन लाभले होते या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. श्रीनिवास काकडे.बागडे सर आणि इतर मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाच्या सुरुवातीला गुणवंत विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केलेया कार्यक्रम प्रसंगी प्रा. श्रीनिवास काकडे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की या क्लासेस नअत्यंत कमी कालावधीमध्ये आपली गुणवत्ता सिद्ध करून दाखवली आहे या जीवघेण्या स्पर्धेमध्ये वडवणी सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थी सुद्धा योग्य मार्गदर्शन मिळाले तर मागे राहत नाही.इथून पुढेविज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना इतरत्र कोठेही क्लासेस ला जायची गरज नसून लातूर औरंगाबाद नांदेड सारखे उच्च गुणवत्तेचे शिक्षण वडवणी मध्ये मिळत असल्याने समाधान व्यक्त करून शिक्षकांच्या कार्याचा गौरव केला विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मरळकर सर यांनी केले तर आभार प्रदर्शन गवारे सर यांनी केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. मुंडे सर सावंत सर आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## रामभाऊ मुंडे यांचे निधन

**वडवणी । प्रतिनिधी**



**तालुक्यातील कोठारबन येथील प्रतिष्ठित नागरिक रामभाऊ मुंडे यांचे दीर्घ आजाराने दिनांक २४ मे रोजी पहाटे निधन झाले. त्यांच्यावर बीड येथील जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू होते.**

रामभाऊ मुंडे यांना पॅरॅलिसिसचा अटॅक आल्याने गेल्या दहा ते पंधरा दिवसापासून सुलतानपूर येथील रुग्णालयामध्ये उपचार सुरू होते. त्यानंतर त्यांना दोन ते तीन दिवसांपूर्वी बीड येथील जिल्हा रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र दिनांक चोवीस मे रोजी पहाटे त्यांची प्राणजोत मालवली. मृत्यू समयी ते ७५ वर्ष वयाचे होते. त्यांच्या पक्षात पत्नी, मुले, मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. पसायदान सेवा प्रकल्पाचे संचालक गोवर्धन दराडे यांचे ते मामा होत.

## पान १वरून...

### ईव्हीएमवरुन निवडणूक

यांनी थेट धमकी दिल्याचे म्हटले आहे. याप्रकरणी, माजी मंत्री सुबोध सावजी यांच्यावर बुलढाण्यातील डोनगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. माजी मंत्री सुबोध सावजी यांनी गुरुवारी मुख्य निवडणूक आयुक्तांना पत्र लिहून ईव्हीएम मशीन बद्दल काळजी व्यक्त केली होती. तसेच, त्यात फेरबदल केल्यास मी तुमचा मुडदा पाडण्यासही मागे पाहणार नाही. अशा शब्दात थेट धमकीची भाषा पत्रात वापरली होती. माजी मंत्र्यांच्या या पत्राची गंभीर दखल घेत पोलिसांनी सुबोध सावजी यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

------------------

### लोकसभा निवडणुकीनंतर

झाल्या आहेत. भारतीय निवडणूक आयोगाने यासंदर्भात माहिती दिली आहे. महाराष्ट्र विधानपरिषद पदवीधर, शिक्षक कार्यकाळ ७ जुलै रोजी संपत आहे. मुंबई पदवीधर सदस्य विलास पोतनीस, कोकण पदवीधर निरंजन डावखरे, नाशिक विभाग किशोरी दराडे आणि मुंबई शिक्षक मतदार संघातून कपिल पाटील यांचा कार्यकाळ ७ जुलै रोजी संपुष्टात येतोय.

-----------

### बीडमध्ये उदंड जहाले

आली होती. गेल्या काही दिवसांत २ सरकारी बाबुंना लाच घेताना अटक केल्यानंतर आता दिनेश राठोड यांनाही ३० हजारांची लाच घेताना लाचलुचपत विभागातील अधिकाऱ्यांनी पकडले आहे. त्यामुळे, गेल्या १० दिवसांपासून जिल्ह्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाया चांगल्याच चर्चेत आहेत. लाच लुचपत विभागाच्यावतीने आणखी एका कर्मचाऱ्याला ३० हजारांची लाच घेताना रंगेहात अटक करण्यात आली आहे. एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यावर ही कारवाई करण्यात आली. गेल्या १० दिवसांतील ही तिसरी कारवाई असल्याने जिल्ह्यातील लाचखोर सरकारी बाबुंमध्ये चांगलीच धास्ती निर्माण झाली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने एक ते दीड आठवड्यात जिल्ह्यात अनेक मोठे मासे गळाला लावले आहेत. विशेष करुन पोलीस दलातील अधिकारी लाचेत अडकल्यानंतर वरिष्ठ ऑफिसरही लाच घेताना पकडले. त्यामुळे, एसीबीच्या कारवाया जिल्ह्यात चर्चेत आहेत. जिल्ह्यातील एसटी महामंडळातील कर्मचारी असलेल्या तक्रारदाराने बीडच्या एसीबीकडे एसटी महामंडळातील वरिष्ठ अधिकारी असलेल्या दिनेश राठोडबाबत तक्रार दिली होती. तक्रारदाराला अंबाजोगाई, परळी येथे नियुक्ती हवी होती. मात्र, त्याठिकाणी त्याला नियुक्ती न देता गावला पाठविण्यात आले होते. दरम्यान, तक्रारदार नियुक्ती देण्यात आलेल्या माजलगावला रुजू झाला नव्हता. १ महिन्यांचा कालावधी झाल्यानंतर त्याच्यावर कारवाईचा ठपका ठेवण्यात आला. मात्र, या कारवाईत सहकार्य करण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या बीडमधील कामगार अधिकारी दिनेश राठोडने कर्मचाऱ्याकडे ३० हजारांची लाच मागितली. मात्र, तक्रारदाराने लागलीच लाचलुचपत विभागाकडे तक्रार केली. त्यानुसार सापळा रचून ही लाच स्वीकारताना एसीबीने लाचखोर अधिकारी दिनेश राठोडला रंगेहात अटक केली आहे.

----------------

### राजस्थानीच्या संचालकांवर

परळी चेअरमन चंदूलाल बियाणी यांच्यासह १७ संचालक व अधिकारी यांच्या विरुद्ध परळी शहर पोलीस ठाण्यात शुक्रवारी पहाटे फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वीज कंपनीचे सेवानिवृत्त कर्मचारी बिभीषण मानाजी तिडके (रा.नेहरू चौक परळी) यांनी दिलेल्या तक्रारी वरून शहर पोलीस ठाण्यात गुरन ७४/२०२४ कलम ४०६,४०९,४२०,१२०(ब)भादवि व महाराष्ट्र ठेवीदार वित्तीय संस्थांमधील हितसंबंध संरक्षण अधिनियम १९९९ कलम ३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**राजस्थानी मल्टिस्टेट संचालक मंडळ**

चेअरमन चंदुलाल बियाणी, संचालक बालचंद्र लोढा, अभिषेक चंदुलाल बियाणी, बद्रीनारायण बाहेती, प्रल्हाद अग्रवाल , विजय लड्डा, अशोक जाजू, सतीश सारडा ,प्रेमलता बाहेती, कल्पना बियाणी, नामदेव रोडे, जगदीश बियाणी, अधिकारी व्ही बी कुलकर्णी, तुषार गायकवाड, प्रदीप मुरकुटे, राजेश मोदानी व सोसायटीचे इतर कर्मचारी यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**संचालक मंडळी गायब**

राजस्थानी मल्टिस्टेट सोसायटीचे चेअरमन व संचालक मंडळ गेल्या काही महिन्यापासून परळीतून निघून गेले आहेत.त्यांचे फोन बंद येत असल्याचे ठेवीदार सांगत आहेत. त्यामुळे ठेवीदारांना आपल्या ठेवीची रक्कम मिळत नसल्याने अनेकांची आर्थिक अडचण झाली आहे.

---------

### इंग्रजी भाषा शिकवण्याची

या कार्यक्रमात लोक भाषा आणि संवादाच्या मूलभूत गोष्टी शिकतात. इंग्रजी व्यतिरिक्त, इटालियन, फ्रेंच, स्पॅनिश आणि मँडरीन सारख्या इतर भाषा देखील शिकण्याच्या संधी आहेत. इंग्रजी शिकणाऱ्या प्रौढांची संख्या सर्वाधिक आहे. आपले करिअर पुढे नेण्यासाठी किंवा परदेशात नोकरी मिळवण्यासाठी ते इंग्रजी शिकत आहेत. इंग्रजी भाषेच्या प्रशिक्षणाची सर्वाधिक मागणी आशिया पॅसिफिक प्रदेशात आहे. येथील मोठी लोकसंख्या आणि वाढती अर्थव्यवस्था या बाजारपेठेला पुढे नेत आहे.

---------

### लोकसभा निकालानंतर

घेतली होती. या याचिकेवर न्यायालयाने दुकानदारांच्या बाजुने निर्णय दिला. लोकसभा निवडणूक निकाल जाहीर होताच मुंबईतील दारू विक्री खुली करण्यास मुंबईत उच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार, दि. २५ मे २०२४ ३

# एकलव्य उच्च माध्यमिक विद्यालय चिखलबीड बारावीचा ९९.२६ टक्के निकाल

वडवणी : इयत्ता बारावी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी मार्च २०२४ परीक्षेमध्ये विद्यालयातून एकूण १३६ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यातील १३५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत त्यापैकी ९० विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातून विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला असून कु.मुंडे लक्ष्मीबाई रामदास ही विद्यार्थिनी ९१.६७% गुण घेऊन सर्वप्रथम आली आहे तर आंधळे सोहम खंडू ९०.१७% व कु.बांगर पूजा सतीश ९०.००%. गुण घेऊन दुसरा आणि तिसरा क्रमांक मिळवला आहे. तर कला शाखेचा निकाल ९७.२२% लागला असून कला शाखेतून कु. शिंदे अनिता अजिनाथ ही विद्यार्थिनी ८१. ८३. % गुण घेऊन प्रथम आली आहे. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थापक अध्यक्ष प्रा. सुशिलाताई मोराळे मॅडम, श्री शिवराज दादा पाखरे, डॉ. अजित दादा पाखरे ,प्राचार्य श्री कानडे सर , बोंदर सर, चंदनशिव सर ,साखरे सर, चोले सर, आंधळे सर, सानप सर, लव्हाळे सर ,गवारे सर ,देशमुख मॅडम, ठोंबरे सर, यादव सर, नेकनुरकर सर, चव्हाण सर, डी टी चव्हाण सर, परदेशी सर, बारगजे सर, बालासाहेब नेहरकर, तोगे मॅडम, नील ध्वज मस्के, हंगे सर व गावातील प्रतिष्ठित नागरिक यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या!

# शेतकऱ्यांवर हमी भावापेक्षा कमी दराने सोयाबीन विकण्याची वेळ

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

कृषी प्रधान असलेल्या आपल्या देशात शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक व मानसिक संकटात आहे. आठ हजार रुपये दराचे सोयाबीन ४३०० रुपयांवर येऊन पोहोचले शेतकऱ्यांना घसरलेल्या सोयाबीनच्या दरामुळे लाखो रुपयांचे नुकसान सहन करून सोयाबीन खरिपाच्या पेरणी अगोदर विकावे लागणार.

सोयाबीनचे दर हमीभावाच्या खाली गेले आहेत शेतकऱ्यांच्या सोयाबीनला हमीभावही मिळत नसल्याने शेतकरी खरीप पेरणीच्या अगोदर संकटात सापडला आहे शासनाच्या हमीभावापेक्षा कमी बाजारभाव मिळत असल्याने अनेक शेतकऱ्यांनी अजून सोयाबीन विक्री च केले नाही.

आपल्या कडे सोयाबीन चे उत्पादन मोठ्या प्रमाणावर झाले असताना देखील केंद्र सरकारने बाहेर देशातून गरज नसताना सोयाबीन खरेदी केल्या मुळे सोयीनचे भाव घसरले आहेत.बाहेर देशाकडून सोयाबीन खरेदी केल्या मुळे



शेतकऱ्याच्या सोयाबीन चे दर निम्म्याहून अधिक किमतीने उतरले.नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये शेतकऱ्यांची व शेतमालांची उमेदवारांना आठवणच झाली नाही याचे आश्चर्य वाटते जवळपास दोन ते तीन महिने होत आहेत सोयाबीनचे दर ४२०० ते ४३०० असे हमीभावाच्या खाली आहेत सध्या केवळ प्रक्रिया करणारे उद्योग ४६०० रुपयांच्या आसपास सोयाबीनला भाव देत आहेत परंतु त्यातही ओलावा माती असेल तर वजनामध्ये काही टक्के कमी केले जातात हे चित्र पाहता सोयाबीनचे दर वाढतील म्हणून सोयाबीन ठेवणारे शेतकरी कमालीचे अडचनित सापडले आहेत लोकसभा निवडणुकीत जातीपातीचे राजकारण करून सामान्य माणसाचां बुद्धिभेद करत शेतकऱ्यांचे प्रश्न कोणीही उपस्थित केले नाहीत मतदान संपल्यानंतर शेतमालाच्या बाजारभावाची घसरण पाहता शेतकऱ्यांना डोक्याला हात लावून बसव लागत आहे सोयाबीनचे दर वाढतील या आशेने अनेक शेतकऱ्यांनी आपले सोयाबीन घरातच साठवून ठेवले आहे परंतु आता खरिपाच्या तोंडावर जो भाव मिळेल त्या भावात विकण्या वाचून शेतकऱ्यांकडे पर्याय राहिला नाही.

**सोयाबीनचे बियाणे १२० किलो आणि शेतकऱ्यांचे सोयाबीन ४५ रुपये किलो**

**राजकीय नेते जातीपातीच्या राजकारणात व्यस्त, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर कधी बोलणार**

**खरिपाच्या पेरणीसाठी भाव वाढेल या आशेवर साठवून ठेवलेले सोयाबीन चार हजार तीनशे रुपयांनी नुकसानित विकावे लागत आहे,बियाणे, खते ,औषधे ,यांच्या किमती झालेली वाढ मजुरी चे वाढलेले दर यामुळे शेती परवडत नाही पण शेती हाच व्यवसाय असल्याने नुकासन सहन करत शेती कसण्या शिवाय पर्याय नाही.आमच्या प्रश्नाकडे राजकीय नेत्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे लाखो रुपयाचे नुकसान सहन करावे लागत आहे.**
**-सूरज नखाते शेतकरी धारूर**

## बार्टी कार्यालयामार्फत तथागत गौतम बुद्ध यांची रमाई नगरमध्ये संविधान प्रवेशिका वाटून जयंती साजरी

वडवणी । प्रतिनिधी

जगाला शांतीचा,समतेचा,व बंधुत्वाचा संदेश देणारे तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या २५६८ व्या जयंतीचे आयोजन आज गुरुवार दि २३.५.२०२४ रोजी नागवंशी बौद्ध विहार येथे करण्यात आले होते.तसेच धम्म रॅलीचे आयोजन सकाळी १० वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक ते नागवंशी बौद्ध विहार अशी संपन्न झाली.रमाई नगरमध्ये ध्वजारोहन सकाळी १०:३० वाजता सभापती बाबासाहेब वाघमारे, अण्णा मस्के, बाबासाहेब साळवे, महादेव तुरे,दिपक उजगरे, संपादक -सतीश वाघमारे,सचीन कसबे,वडमारे सर,अमोल उजगरे, हनुमंत उजगरे, महादेव साळवे, यांच्या सह मान्यवंराच्या उपस्थितित संपन्न झाले.

प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी



जगाला शांतीचा समतेचा व बंधुत्वाचा संदेश देणारे तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या २५६८ व्या जयंती निमित्त रमाई नगरमध्ये बार्टी कार्यालय बीड मार्फत तथागत गौतम बुद्ध पौर्णिमेनिमित्त रमाई नगर व बौद्ध विहार येथे कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्षेत्र वडवणी तालुका समता दुत महादेव तुरे यांनी संविधानाच्या प्रवेशिकाचे मान्यवरांना वाटप करण्यात आले.त्यानंतर वडवणी शहरामध्ये धम्म रॅलीचे आयोजन करण्यात आले व नागवंशी बुद्ध विहार येथे रॅलीचे विसर्जन करुन त्या ठिकाणी झेंडावंदन करण्यात आले व त्यानंतर बाबासाहेब साळवे यांनी प्रस्थाविक केले.व प्रा प्रकाश खळगे सर यांनी सखोल आसे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संपादक सतीश वाघमारे व बळीराम उजगरे यांनी केले.

## जनावरांची संख्या कमी झाल्यामुळे शेणखत महागले

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यात सध्या शेती मशागतीचे कामे जोमात सुरू आहेत. त्यातच वर्षेभर साठलेल्या जनावरांचे शेणखत सुद्धा शेतकरी शेतामध्ये खात टाकत आहेत. शेणखत हे शेतीला उत्तम असल्यामुळे शेणखताला चांगला भाव आला आहे. रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनीची सुपिकता घसरत चालली आहे. त्यामुळे अनेक शेतकरी सेंद्रिय शेती, जैविक शेती करण्यावर भर देत आहेत. त्यासाठी शेतकरी शेणखताचा वापर करीत आहेत.

मात्र, यांत्रिकीकरणामुळे गाय, म्हैस, बैल, शेळ्या, मेंढ्या या पशुधनाच्या घटीमुळे शेणखताला सध्या सोन्याचा भाव आला आहे. अंबाजोगाई तालुक्यातील गावांमध्ये एक शेणखताला चांगलेच पैसे मोजावे लागत आहेत. दहा वर्षांपूर्वी गाव शिवारात सहज मिळणारे शेणखत आता अधिक दरात मिळत आहे. अंबाजोगाई तालुक्यात मजुरांची टंचाई व यांत्रिकीकरणामुळे गाय, म्हैस, बैल, शेळ्या अशा पशुधनाच्या किंमती वाढल्याचा फटकाही पशुपालनास बसला आहे. चार्याचे वाढलेले भाव व चाराटंचाई यामुळे शेतकरी जनावरे पाळण्यास



नकार देत आहेत, तर अनेक शेतकर्यांनी सेंद्रिय शेतीची कास धरल्यामुळेही शेणखताची मागणी वाढली आहे. पूर्वी एक हजार ते दीड हजार रुपये ट्रॅक्टर-ट्रॉली या दराने शेणखत मिळत होते. ते सध्या चार हजार ते पाच हजार रुपये ट्रॉलीप्रमाणे मिळत आहे. शेण, मूत्र, शेतातील पालापाचोळा यापासून जे खत तयार होते, ते आम्ही शेतात वापरतो. शेतात टाकून शिल्लक राहिलेल्या शेणखताची विक्री करतो. रासायनिक खतांचे दर वाढल्याने व नोकरदार, मोठे व्यापारी शेती खरेदी करून सेंद्रिय शेती करण्याकडे त्यांचा कल वाढला आहे. त्यामुळे शेणखताचे दरही वाढल्याचे दिसत आहेत.

## पत्नीच्या पुण्यस्मरणार्थ अनाथ आश्रमास अन्नधान्य व किराणा साहित्य



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथील उमेश आठवले यांनी पत्नीच्या तिसऱ्या पुण्यस्मरणार्थ इंन्फड इंडिया आंनदग्राम विशेष बालगृहातील अनाथ मुलांसाठी एक महिन्याचे (ता.२०) सोमवारी अन्नधान्य दान केले. अंबाजोगाई येथील क्रीडा प्राध्यापक उमेश आठवले यांच्या पत्नी उपसना आठवले ह्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात अधीचारिका या पदावर कार्यरत होत्या. त्या त्याचे कर्तव्य इमाने इतबारे पारपाडत होत्या. रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा म्हणून कार्यकरत होत्या. कोरोणा काळात कोरोणाच्या अतिदक्षता वार्डमध्ये सेवा बजावित असता त्यांना कोरोणाची बाधा झाल्याने त्यांचे निधन झाले. त्यांच्या पुण्यस्मरणार्थ गेल्या तीन वर्षांपासून त्यांचे पती उमेश व मुलगी शेफाली आठवले हे वृद्धाश्रमातील वृध्दाना व अनाथ आश्रमातील बालकांना मदत करून पुण्यतिथी साजरी करतात. (ता.२०) सोमवारी तिसऱ्या पुण्यस्मरणार्थ इंन्फड इंडिया आंनदग्राम विशेष बाळगृह किराणा सहित्य व अन्नधान्य देवून पुण्यतिथी साजरी केली.

## गणपतराव मोराळे गुरुजी इंग्लिश स्कूलचा ९८.६६ टक्के तर जीवन प्रगती विद्यालयाचा ९८.६३ टक्के निकाल

प्रथम

कु.हांगे अभिलाषा
91.83%

द्वितीय

कु.मांडवकर अनुजा
84.83%

द्वितीय

कु.हांडगे ज्ञानेश्वरी
84.83%

तृतीय

चि.मोराळे शैलेश
84.33%

प्रथम

कु.करडकर ज्ञानेश्वरी
82.67%

द्वितीय

कु.पवार तेजल
82.17%

तृतीय

कु.मुंडे स्नेहल
78.67%

तृतीय

कु.डोरले प्रियंका
78.50%

**जीवन प्रगती शिक्षण संस्थेची यशाची परंपरा कायम**

**बीड । प्रतिनिधी**

शिवराज आंधळकर नांदूर घाट

जीवन प्रगती शिक्षण संस्था संचलित जीवन प्रगती विद्यालय व कनिष्ठ महाविद्याल नांदूर घाट चा निकाल ९८.६३ % लागला असून यामध्ये कला शाखेमधून प्रथम क्रमांक करडकर ज्ञानेश्वरी गोरख ८२.६७% द्वितीय क्रमांक पवार तेजस हनुमंत ८२.१७% व तृतीय क्रमांक मुंडे स्नेहल माधव ७८.६७% यांनी पटकिवला आहे. तर विज्ञान शाखेमधून प्रथम क्रमांक बिक्कड ओम दिनेश ८५.५०% तर द्वितीय क्रमांक दराडे तनवी नानासाहेब ८४.६७% तर तृतीय क्रमांक घोळवे शिवम किंचक ८३.१७% घेऊन यश संपादन केले आहे. गणपतराव मोराळे गुरुजी इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज चा ९८.६६% निकाल लागला असून यामध्ये प्रथम क्रमांक हंगे अभिलाषा आनंद ९१.८३% द्वितीय क्रमांक क्रमांक मांडवकर अनुजा बबन ८४.८३%, हांडगे ज्ञानेश्वरी श्रीमंत ८४.८३% तृतीय क्रमांक मोराळे शैलेश सतीश ८४.३३% मिळवला आहे या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे जीवन प्रगती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्रीमती सावित्रीबाई अक्का मोराळे संस्थेचे कोषाध्यक्ष रमेश अण्णा मोराळे साहेब,संस्थेचे आधारस्तंभ राजेशजी मोराळे साहेब, संस्थेच्या सचिव माधुरीताई मोराळे,संस्थेचे संचालक जनार्धन बापू हंगे साहेब, डॉक्टररोहित मोराळे साहेब व जीवन प्रगती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक विलास ढाकणे सर,प्राचार्य साई सर, तसेच प्राध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# पाणीपुरवठा करणाऱ्या टँकरला डिझेल वाचून वारंवार ब्रेक

**गेवराई तालुक्यात पाण्याच्या टँकरमध्ये देखील घोटाळा; ठेकेदाराला ताळ्यावर आणण्यासाठी अंदोलन करणार - धम्मपाल कांडेकर**

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागात दुष्काळामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.त्यामुळे ग्रामीण भागात गेवराई येथून पाणीपुरवठा केला जातो परंतु ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे डिझेल वाचून अनेक टँकर वारंवार सतत उभे राहत असल्याचे पाहायला मिळत असल्याने या गंभीर प्रकरणाकडे जिल्हाधिकारी यांनी लक्ष घालावे अशी मागणी ग्रामीण भागातून होत आहे.दरम्यान गेवराई तालुक्यात पिण्याच्या पाण्याच्या टँकरमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमता होऊन घोटाळा आता होत असल्याचे ग्रामीण भागातून बोलले जात आहे.दरम्यान आता ठेकेदाराला ताळ्यावर आणण्यासाठी तिव्र अंदोलन करण्यात येणार आसल्याचे पॅन्थर रिपब्लिकन पक्षाचे प्रदेश युवक अध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष धम्मपाल कांडेकर यांनी सांगितले.

गेवराई तालुक्यात दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली असून पाण्यावाचून नागरिकांचे व मुक्या जनावरांचे हाल होत आहेत.त्यामुळे तालुक्यातील ग्रामीण भागात शासनाने टँकरद्वारे पाणीपुरवठा योजना राबवली आहे.तालुक्यात जवळपास शंभर टँकरने पाण्याचा पुरवठा होत आहे.गेवराई तालुक्यातील पाणीपुरवठा करणारा ठेकेदार हा मनमानी कारभार चालवत असल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना वेळेवर पाणी मिळत नाही.ठेकेदार हा टँकर मध्ये डिझेल टाकण्यासाठी टँकर मालकांना वेळेवर पैसे देत नाही त्यामुळे दोन चार दिवसाला एक वेळेस टँकर हे उभे असतात,याचा फटका ग्रामीण भागातील नागरिकांना बसत असून याकडे जिल्हाधिकारी यांनी लक्ष घालण्याची मागणी ग्रामीण भागातील नागरिक करत आहेत.दरम्यान तालुक्यात टँकरच्या पाण्यामध्ये देखील घोटाळा होत असताना तालुक्यातील सर्वच पक्षाचे नेते व पदाधिकारी का गप्प बसत आहे असे देखील नागरिकांकडून आता बोलले जात आहे.दरम्यान ठेकेदाराला ताळ्यावर आणण्यासाठी पाण्याच्या टाकीजवळ तिव्र अंदोलन करण्यात येणार आहल्याचे पॅन्थर रिपब्लिकन पक्षाचे प्रदेश युवक अध्यक्ष धम्मपाल कांडेकर यांनी सांगितले.

### गेवराई येथील फिल्टर प्लंटवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची मागणी

गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागात ज्या टँकरने पाणीपुरवठा केला जातो ते सर्व टँकर गेवराई येथील भगवान नगर भागात असलेल्या नगरपरिषदच्या फिल्टर प्लॅन पाणी टाकी इथून भरून जातात.तेथील गेटवर सीसीटीव्ही कॅमेरा बसवला तर दिवसभरात कोणत्या गावात किती फेऱ्या होत आहेत हे कळू शकते.यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना दररोज वेळेवर पाणी मिळेल व ठेकेदारालाही चांगलीच चपराक बसेल.त्यामुळे गेवराईतील फिल्टर प्लॅनच्या गेटवर सीसीटीव्ही कॅमेरा बसवण्यात यावा अशी मागणी नागरिक करत आहेत.

### ठेकेदाराला ताळ्यावर आणण्यासाठी तिव्र अंदोलन करणार - धम्मपाल कांडेकर

गेवराई शहरातील फिल्टर प्लॅन येथून ग्रामीण भागाला टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो.या फिल्टर प्लांटच्या बाजूला समृद्धी पार्क आहे.या समृद्धी पार्क मधील नळ कनेक्शन या टँकरच्या ये जा करण्याने सतत लिकेज होऊन तुटतात.त्यामुळे या जागी मोठा खड्डा पडलेला असून दि.१६ रोजी रात्रभर एक टँकर त्यात बसून राहिला होता तेव्हापासून दि. १७ रोजी पर्यंत त्या तुटलेल्या नळावाटे लाखो लिटर पाणी वाया गेले. ऐन दुष्काळात एवढे पाणी वायाला गेले याला जिम्मेदार कोण ? तर ठेकेदारांनी आधीच लक्ष घातले असते तर लाखो लिटर पाण्याची नासाडी वाचली असती.दरम्यान ठेकेदाराला ताळ्यावर आणण्यासाठी तिव्र अंदोलन पाण्याच्या टाकीजवळ करणार असल्याचे पॅन्थर रिपब्लिकन पक्षाचे युकक प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष धम्मपाल कांडेकर यांनी सांगितले.

## पान ६ वरून...

### अंबाजोगाई शहरातील स्वच्छता

प्रशासक नगर परिषद अंबाजोगाई यांनी याकडे जातीने लक्ष घालून अंबाजोगाई करांची पाण्याविना होणारी फरफट थांबवावी अशी मागणी निवेदनाद्वारे राजकिशोर मोदी यांनी केली आहे. त्याचबरोबर अंबाजोगाई शहरात मागील काही महिन्यांपासून रस्त्याची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. सुरू असलेली कामे अतिशय संथ गतीने चालू आहेत. या कासव गतीच्या कामामुळे देखिल नागरिक त्रस्त झाले आहेत. तेव्हा शहरात संथ गतीने होत असलेली रस्त्याची कामे तात्काळ पूर्ण करण्यासाठी संबंधित एजन्सीला आदेशीत करावे. तसेच नगर परिषदेच्या स्वच्छता विभागाचे देखील शहर स्वच्छतेकडे दुर्लक्ष होत आहे. यामुळे शहरात ठिकठिकाणी घाण दिसून येत आहे. यावरही संबंधित विभागास तात्काळ स्वच्छते विषयी आदेशीत करून अंबाजोगाई वासीयांच्या मूलभूत प्रश्नांकडे विनाविलंब लक्ष द्यावे अशी मागणी या निवेदनाद्वारे राजकिशोर मोदी यांनी समस्त अंबाजोगाई वासीयांच्या वतीने करण्यात येत आहे.

तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनावर राजकिशोर मोदी यांच्यासह माजी उप नगराध्यक्ष मनोज लखेरा, माजी नगरसेवक महादेव आदमाणे, कचरूलाल सारडा, खालेद चाउस, सुनील वाघाळकर दिनेश भराडीया, सुनील व्यवहारे,अमोल लोमटे, धम्मा सरवदे, सुधाकर टेकाळे, गोविंद पोतंगले, उज्जेन बनसोडे, अकबर पठाण, तौसिफ सिद्दीकी, शाकेर काझी, सुभाष कोळी, विष्णू पांचाळ,सचिन जाधव,दत्ता सरवदे, वजीर शेख, सय्यद ताहेर,विशाल पोटभरे, कैलास कांबळे,भारत जोगदंड, बालाजी जोगदंड, सुशील जोशी, जमादार पठाण, अरबाज पठाण, खलील जाफरी, शरद काळे, जावेद शेख, शाहिद शेख, रफिक गवळी, मुनिर शाह, अस्लम शेख यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### खरीप हंगामाच्या तयारी

निसर्ग साथ देत नाही.शासन शेतकऱ्यांच्या पाठिशी उभे राहायला तयार नाही.सारी यंत्रणाच शेतकऱ्यांना मारक ठरली आहे.तरीही मोठ्या हिंमतीने बळीराजा शेती करतो आहे. कापसाचे दर कोलमडल्याने कवडीमोल भावाने कापूस,सोयाबीन विकावा लागला. त्याचा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसला आहे. त्यामुळे कर्जाचा फास दिवसेंदिवस घट्ट होत चालला आहे.शेतकऱ्यांना आता कुणीच वाली उरला नाही.उन्हाळ्याचे दिवस असल्याने शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील मशागतीला सुरुवात केली आहे.यंदा उन्हाळ्यातही अवकाळी पाऊस पडत आहे.त्यामुळे खरिपातील पेरणीसाठी वेळेवर पाऊस पडेल,या आशेवर शेतकरी लगबगीने ४३ अंशांचा पारा अंगावर झेलत रखरखत्या उन्हात शेतीच्या कामात व्यस्त आहेत.

### पिण्याच्या पाण्यासाठीच्या

सोडविला गेलेला नाही मुख्य म्हणजे पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थापन करणे हे नगर परिषदेचे काम असते पण त्यांनाही ते वर्षानुवर्षे जमले नाही अनेक भागात कर्मचाऱ्यांच्या संगनमताने बोगस नळ दिलेले आहेत त्याच प्रमाणे लिकेजेस देखील आहेत रस्त्यावरून पाणी वाहत जात असते पण त्याकडे दुर्लक्ष केले जाते खरे पाहता चार ते पाच दिवसाला पाणी पुरवठा करण्यात यावा अशी नागरिकांची वेळोवेळी मागणी असते पुढारी आणि शासन कर्ते ह्या मागण्यांची दखलच घेत नाहीत.

### जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी

येणार असून शुक्रवार दि.३१ मे २०२४ रोजी अभिवादन सभा तर रविवार दि.०२ जून रोजी सकाळी ठिक ९ ते दुपारी ०२ यावेळेत पारंपरिक वेशभूषेतील झांज पथकाच्या तालावर गेवराई शहरातून आगळ्यावेगळ्या पद्धतीने मिरवणूक काढण्यात येणार आहे. आकर्षक पद्धतीने सजावट केलेल्या भव्यदिव्य अशा रथातून राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेची गेवराई शहरातून मिरवणूक काढून शांततामय मार्गाने हा जयंती उत्सव सोहळा साजरा करण्यात येणार आहे अशी माहिती सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष - राधेश्याम दातार यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे दिली आहे. आगळ्यावेगळ्या पद्धतीने होणाऱ्या या जयंती उत्सव सोहळ्याला गेवराई शहरातील तसेच ग्रामीण भागातील सर्व जातीधर्मातील समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहून आनंद द्विगुणित करावा असे आवाहन देखील जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### राहुल देशमुख यांच्यावरील

यांना निवेदन देऊन गृहमंत्र्यांनी दडपशाही थांबवावी तसेच शेतकरी कामगार पक्षाचे नेते काटोल नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष भाई राहुल देशमुख यांच्यावर दाखल केलेले गुन्हे तात्काळ परत घेऊन त्यांची सुटका करण्यात यावी या मागणीसाठी तहसील कार्यालयासमोर शिर्शासनासह ठिय्या मांडून प्रचंड शासनाच्या विरोधात घोषणाबाजी करत शासनाचा निषेध केला व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दडपशाही न थांबवल्यास आणि भाई राहुल देशमुख यांच्यावरील खोटे गुन्हे परत न घेतल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांच्यासह भाई मुंजा पांचाळ, भाई परमेश्वर डाके गणेश डाके, परसराम राठोड, ज्ञानदीप गोले, भाई राहुल सोळंके, साळुजी हांडे, विष्णू शेळके, अनंत चव्हाण, सुदाम चव्हाण, लक्ष्मण आप्पा चव्हाण आदींनी दिला.

### संत बंकटस्वामींनी गावागावात

नानासाहेब काकडे, सर्जेराव खटाणे, नवनाथ कुलकर्णी, महेंद्र फुटाणे, सचिन पाटील, अशोक शिंदे, पांडुरंग रोकडे, कल्याण शिंदे, अशोक शिंदे, मोहनराव शिंदे आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी संत बंकटस्वामींना अभिवादन करत त्यांच्या जीवनावर आधारित काही बाबी सांगितल्या संत बंकटस्वामींनी केलेल्या वारकरी सांप्रदायाच्या प्रसार आणि प्रचाराबाबत माहिती दिली. संत भगवान बाबा आणि संत वामन भाऊ हे दोन शिष्य बीड जिल्ह्यातीलच असल्यामुळे संत बंकट स्वामींचा वसा आणि वारसा त्यांनी पुढे नेला. संत बंकटस्वामींनी वारकरी सांप्रदाय गावागावात पोहोचवण्याचे काम केले, बीड जिल्हा ही संतांची भूमी म्हणून त्यामुळेच ओळखली जाऊ लागली आहे. आज मठाधिपती लक्ष्मण महाराज मेंगडे संस्थानच्या माध्यमातून हजारो वारकर्यांची सेवा करत असल्याचा अभिमान वाटतो असे ते म्हणाले यावेळी ह.भ.प. उल्हास महाराज सूर्यवंशी यांचे काल्याचे कीर्तन झाले.

# कोथिंबीर, मेथीची जुडी खातेय 'भाव'! पालेभाज्यांचे दर कडाडले!

## शेतकऱ्यांना फायदा मात्र सामान्यांचं बजेट गडबडलं

नाशिक : मे महिना सरत आला तरी पावसाचा पत्ताच नसल्याने त्याचा परिणाम आता भाजीबाजारावर स्पष्ट जाणवू लागला आहे. सकाळच्या नाश्त्यापासून ते रात्रीच्या जेवणापर्यंत कोणत्याही पदार्थाची लज्जत वाढवणारी कोथिंबीर सध्या नाशिकमध्ये 'भाव' खात असून ७५ रुपयाच्या भावाने विकली जात आहे. त्यामुळे गृहिणीचे भाजीपाल्याचे रोजचे बजेट कोलमडले आहे. शहरातील विविध भाजी बाजारात भाजीपाल्याच्या दरात मोठी वाढ झाल्याने शेतकरी वर्गाला काहीसा दिलासा मिळत असला तरी ग्राहकांच्या खिशाला मात्र कात्री लागली आहे.

कोथिंबीर ही प्रत्येकाच्या घरात वापरलीच जाते. पण आता याच कोथिंबिरीचा दर गगनाला भिडला असून कोथिंबीर जुडी थेट ७५ रुपयांना विकली जात आहे. शेतीतील उभ्या पिकांना पाणी कमी पडू लागल्याने शेतीमालावर परिणाम होत आहे.नाशिक बाजार समिती ५०% शेतमालाची आवक झाली आहे. शेतमालाची आवक घटल्याने बाजार भाव तेजीत आहेत. अशातच सर्वच भाज्यांत वापरल्या जाणाऱ्या कोथिंबीर जुडीने



उच्चांक गाठला आहे.

शेतमालाची आवक घटल्याने बाजार भाव तेजीत

आवक कमी झाल्याने नाशिकमध्ये सध्या कोथिंबिरीला चांगला भाव मिळत आहे. बाजारात ७५ रुपयांनी कोथिंबीर जुडीची विक्री होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगला फायदा होत असून सर्वसामान्यांनी मात्र तोंडात बोटे घातली आहेत. आठ दिवसांपासून दमटपणासह उकाड्यात वाढ होत आहे. नाशिकसह जळगाव, धुळे, मालेगाव या उत्तर महाराष्ट्रासह मुंबई, ठाणे, पालघरमध्ये उष्ण आणि दमट वातावरणाचा 'यलो अॅलर्ट' देण्यात आला आहे. राज्यातील अनेक भागात पाण्याची टंचाई भासत आहे. यामुळे अद्यापही शेतमालाची आवक देखील बाधित झाली आहे. नियमित होत असेल्या आवकेच्या तुलनेत अवघी ५० ते ६० टक्के आवक सध्या सुरू असल्याने भाजीपाल्याचे दर कडाडलेलेच आहेत. पालेभाज्या तर मिळेनाशा झाल्या आहेत. ज्या थोड्याफार पालेभाज्या उपलब्ध होत आहेत. त्यांचे दरही जास्त असल्याचे चित्र आहे.

मेथी आणि कांदापात ५० रुपये जुडी

शेतकरी बांधवांकडील भाजीपाला कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दाखल होत असतो. तेथून विक्रेत्यांकडून भाजीपाला खरेदी करत किरकोळ बाजारात विक्री केली जाते. नियमित आवकेच्या सुमारे ५० ते ६० टक्केच आवक सध्या होत आहे. त्यामुळे कोणत्याही भाजीचे दर २५ किंवा ३० रुपये पावशेरपासून सुरु होऊन १२० ते १५० रुपये किलोपर्यंत जात आहेत. कोथिंबीरसह सर्व पालेभाज्या महागल्या आहेत. मेथी आणि कांदापात ५० रुपये जुडी एवढा भाव मिळत आहे.

## राज्यात उष्णतेची लाट येणार, अवकाळीचा जोरही कायम राहणार

राज्यातील तापमानात सातत्यानं वाढ होत आहे. कुठं उन्हाचा चटका बसत आहे. तर कुठं अवकाळीचा जोर पाहायला मिळत आहे. दरम्यान, संपूर्ण विदर्भ, मराठवाडा, नंदुरबार, धुळे जळगांव, नाशिक, अहमदनगर अशा २४ जिल्ह्यात दुपारचे कमाल तापमान सरासरीपेक्षा ४ ते ६ डिग्री से. ग्रेड ने अधिक वाढणार आहे. म्हणजे ४० ते ४४ डिग्री से. ग्रेड दरम्यानचे राहणार असल्याची माहिती ज्येष्ठ हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली आहे. पण या स्थितीतही अवकाळीची शक्यता कायम राहणार आहे. आजपासून पुढील तीन दिवस म्हणजे शनिवार दिनांक २५ मे पर्यंत उष्णतेच्या लाटेची स्थिती जाणवू शकते अशी माहिती माणिकराव खुळे यांनी दिली आहे. पुढील तीन दिवस गुजरात राज्य आणि मुंबईसह कोकणातील ७ जिल्ह्यात उष्णतेची लाटसदृश स्थितीसहित दमटयुक्त उष्णतेची स्थिती जाणवेल. विशेषतः या उष्णतेचा प्रभाव मुंबई शहर, ठाणे, पालखेड येथे अधिक जाणवेल, अशी माहिती माणिकराव खुळे यांनी दिली.

अवकाळीची शक्यता कायम

उष्णतेची लाट सदृश्यस्थिती असली तरी संपूर्ण महाराष्ट्रात आजपासून पुढील तीन दिवस म्हणजे २५ मे पर्यंत ढगाळ वातावरणासहित तुरळक ठिकाणी किरकोळ अवकाळी पावसाची शक्यता कायम आहे. गुरुवार, शुक्रवार म्हणजेच दिनांक २३ आणि २४ मे असे दोन दिवस दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, सोलापूर, बीड, धाराशिव, लातूर, परभणी आणि नांदेड या ८ जिल्ह्यात अवकाळीची शक्यता अधिक जाणवेल अशी माहिती माणिकराव खुळे यांनी दिली. मराठवाड्यासह विदर्भातील १९ जिल्ह्यात २४ मे पासून अवकाळीचे ढगाळ वातावरणही निवळेल. तर मुंबईसह कोकण, खान्देश, नाशिक नगर पुणे सातारा सांगली कोल्हापूर सोलापूर येथे मात्र २४ मे नंतरही वातावरण टिकून राहील. दरम्यान, अंदमानवर पोहोचलेल्या मान्सूनची आगेकूच कायम असून बंगालच्या उपसागरात आठवड्यादरम्यान कदाचित चक्रीवादळाच्या बीज-रोवणीही होवु शकते असे वाटते.

अवकाळी पावसाचा शेती पिकांना मोठा फटका

दरम्यान, सध्या सुरु असलेल्या अवकाळी पावसाचा मोठा फटका काही भागातील शेती पिकांना बसला आहे. शेतकऱ्यांची हाती आलेली पिकं वाया गेली आहेत. विशेषत: फळबागांसह भाजीपाला पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळं शेतकरी चिंतेत आहेत. दरम्यान, अशाच स्थितीत आणखी अवकाळी पावसाची शक्यता सांगितली आहे. त्यामुळं शेतकऱ्यांना चिंता वाटत आहे. दरम्यान, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी सरकारकडे मदतीची मागणी केली आहे.




## निर्यातबंदी हटवल्यानंतर ४५ हजार टन कांद्याची निर्यात

### मात्र शेतकरी नाराजच, नेमकं प्रकरण काय?

केंद्र सरकारनं कांद्याची निर्यातबंदी हटवल्यानंतर ४५ हजार टन कांद्याची निर्यात झाली आहे. ही निर्यात मागील १८ दिवसात झाली आहे. सरकारनं ३ मे रोजी कांद्याच्या निर्यातीवरील बंदी हटवली होती. त्यानंतर आत्तापर्यंत ४५ हजार टन कांद्याची निर्यात होऊनही शेतकरी नाराज आहे. शेतकरी नेमके नाराज का आहेत? नेमकं प्रकरण काय? याबाबतची सविस्तर माहिती पाहुयात.

कवडीमोल दरानं कांद्याची विक्री

कांद्यावरील निर्यातबंदी हटवून देखील शेतकऱ्यांना कमी दरात कांदा विकावा लागत आहे. याचे कारण म्हणजे कांद्याच्या निर्यातीवर लावलेली बंधने. यामध्ये कांद्यावरील किमान निर्यात मूल्य आणि निर्यात शुल्क यांचा समावेश आहे. यामध्ये किमान मूल्य हे ५०० डॉलर प्रतिटन आहे. तर निर्यात शुल्क हे ४० टक्के आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कवडीमोल भावाने कांदा बाजारात विकावा लागत आहे. यामुळं शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च देखील निघत नाही.

८ डिसेंबर २०२३ रोजी कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली होती

सध्या लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरु आहे. या काळात कोणत्याही वस्तूंच्या किंमती वाढू नये असे सरकारला वाटत आहे. त्यामुळं सरकारनं दर नियंत्रणात ठेवण्यासाठी विविध धोरणं आखली आहेत. यातीलच एक धोरण म्हणजे कांद्याच्या निर्यातीवर घातलेली बंदी. सरकारनं ८ डिसेंबर २०२३ रोजी कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली होती. ही बंदी ३१ मार्च २०२४ पर्यंत असेल असं



सांगितलं होतं. मात्र, सरकारनं मार्चमध्ये कांद्यावरील निर्यातबंदी उठवली नाही. जोपर्यंत पुढील आदेश येत नाही तोपर्यंत कांदा निर्यातबंदी कायम राहणार असे सरकारनं सांगितलं. त्यानंतर ३ मे रोजी सरकारनं कांद्याच्या निर्यातीवरील बंदी हटवली आहे. बंदी हटवल्यापासून आत्तापर्यंत ४५ हजार टन कांद्याची निर्यात झाली आहे. एवढी निर्यात होऊनही शेतकरी नाराज आहेत. कारण त्यांच्या कांद्याला योग्य तो दर मिळत नसल्याचे चित्र आहे. सर्वाधिक कांद्याची निर्यात ही पश्चिम आशिया आणि बांगलादेशात होते.

चालू वर्षात ५,००,००० टन कांदा खरेदीचं लक्ष

चालू वर्षासाठी सरकारनं ५,००,००० टन कांदा खरेदी करुन लक्ष्य बफर स्टॉक करण्याचे लक्ष ठेवले आहे. सध्या नुकत्याच झालेल्या रब्बी (हिवाळी) पिकातून कांद्याची खरेदी सुरू केली आहे. कृषी मंत्रालयाच्या प्राथमिक अंदाजानुसार, महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र या प्रमुख उत्पादक प्रदेशांमध्ये उत्पादन कमी झाल्यामुळे देशातील कांद्याचे उत्पादन वर्ष २०२३-२४ मध्ये १६ टक्क्यांनी घटून २५.४ दशलक्ष टन होईल. दुसरीकडे महाराष्ट्रातून आलेली बातमी अतिशय धक्कादायक आहे. नुकसान सोसून शेतकऱ्यांना कांदा बाजारात विकावा लागत आहे. निर्यातीवर किमान निर्यात मूल्य आणि ४० टक्के निर्यात शुल्क लागू केल्याने शेतकऱ्यांसमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत. बाजारपेठेत कांद्याचा पुरवठा वाढला आहे. त्याचा परिणाम भावावर दिसून येत आहे.

## खतांचं योग्य नियोजन, यावर्षी तुटवडा होणार नाही, विकास पाटील यांची माहिती

डीएपी आणि इतर रासायनिक खतांचा योग्य नियोजन सरकारने केलं आहे. नियोजनानुसार डीएपी खते उपलब्ध होण्यास सुरुवात झाली असल्याची माहिती कृषी विभागाच्या निविष्ठा व गुण नियंत्रणचे संचालक विकास पाटील यांनी दिली आहे. त्यामुळं बाजारात कुठेही खतांचा आणि खास करुन डीएपी खतांचा तुटवडा होणार नसल्याचा दावा कृषी विभागाने केला आहे.

केंद्र सरकारने निश्चित दिलेल्या दरावरच शेतकऱ्यांना खते मिळणार :

आंतरराष्ट्रीय युद्धजन्य परिस्थिती खास करुन इजराइल आणि हमास यांच्यात सुरू असलेले युद्ध या कारणामुळे काही रासायनिक खतांच्या विशेषत्वाने डीएपीसाठीचा कच्चामाल उपलब्ध नाही. म्हणून यंदा खतांची उपलब्धता राहणार नाही. खतांचे दर वाढतील अशी भीती व्यक्त केली जात होती. मात्र, कृषी विभागाच्या निविष्ठा व गुण नियंत्रन संचालक विकास पाटील यांनी राज्यात खतांची मुबलक प्रमाणात उपलब्धता सरकारने योग्य नियोजन केले आहे. राज्यात केंद्र सरकारने निश्चित करून दिलेल्या दरावरच शेतकऱ्यांना डीएपी व



इतर खत उपलब्ध होईल असा दावा केला आहे.

सध्या देशातील सरकारी धोरण आणि हमास, इजराईल येथे युद्धजन्य परिस्थितीत होणाऱ्या सततच्या हल्ल्यामुळे रासायनिक खताच्या निर्मितीसाठी लागणरे साहित्य गरजेनुसार मिळत नाही. तसेच जे मिळत आहे त्यांचे दर जास्त असल्याने ते खरेदी करणे शक्य नसल्याचे मत खत व्यापाऱ्यांकडून सांगण्यात आले होते. दुसरीकडे शासनाकडून मिळणाऱ्या सवलती देखील तुटपुंजी असल्याने अशा खतांची निर्मिती करणे शेतकऱ्यांसह व्यापाऱ्यांनाही परवडणारे नाही. त्यामुळे या हंगामात शेतकऱ्यांना डी ए पी सारखी रासायनिक खते मिळणार नसल्याचे मत रासायनिक खताचे होलसेल विक्रेत्यांनी सांगितले होते. मात्र, राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार यावर्षी कोणत्याही प्रकारच्या खतांचा तुटवडा भासणार नसल्याचे सांगण्यात आले आहे.

शेतकऱ्यांना रासायनिक खते मिळणार का?

खरीप हंगाम तोंडावर आला कि शेतकरी पेरणीच्या तयारीला लागत असतात. मात्र, पेरणीपूर्वी शेतकरी आपल्या शेतात पिकाच्या वाढीसाठी डीएपी सारखी रासायनिक खते वापरत असतात. असे असताना आता शेतकऱ्यांना ही रासायनिक खते मिळणार नसल्याचे चित्र आहे.

कारण रासायनिक खते निर्मिती करणाऱ्या कंपन्यानी डीएपी खते निर्मिती जवळपास बंद केल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे डीएपी सारखी खते कमी किमतीत देणे शक्य नसल्याचे खत विक्रेते आणि व्यापाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१०८५ : कॅस्टिलचा राजा आल्फोन्सो सहाव्याने स्पेनमधील टोलेडो शहर मूरांकडून जिंकले.
१६११ : मुघल शासक जहागीर यांनी महरुन्निसा यांच्याबरोबर विवाह केला. यानंतर त्यांचे नाव नूरजहाँ असे पडले.
१६५९ : रिचर्ड क्रॉमवेलने इंग्लंडच्या रक्षकपदाचा राजीनामा दिला.
१६६६ : शिवाजी महाराज आग्रा येथे नजरकैदेत.
१८१० : सेमाना दि मेयो आर्जेन्टिनात नागरिकांनी बोयनोस एर्समधून स्पेनच्या व्हाइसरॉयला हाकलले.
१८६५ : अमेरिकन यादवी युद्ध अलाबामात मोबिल शहराजवळ शस्त्रसाठ्यात स्फोट. ३०० ठार.
१९७० : बोईंग संगणक सेवेची स्थापना करण्यात आली.
१८९५ : फोर्मोसाच्या प्रजासत्ताक ची स्थापना.
१९२६ : युक्रेनच्या परागंदा सरकारच्या अध्यक्ष सिमोन पेटलियुराची हत्या.
१९३५ : जेसी ओवेन्सने ४५ मिनिटात वेगवेकळ्या शर्यतींमध्ये चार विश्वविक्रम नोंदवले.
१९३८ : स्पॅनिश गृहयुद्ध अलिकान्ते शहरावर बॉम्बफेक. ३१३ ठार.
१९४० : दुसरे महायुद्ध डंकर्कची लढाई सुरू.
१९४६ : अब्दुल्ला जॉर्डनच्या राजेपदी.
१९५३ : अमेरिकेच्या सैन्याने परमाणुशस्त्रे असलेल्या तोफगोळ्यांची चाचणी केली.
१९५५ : जगातील उंचीनुसार तिसरे शिखर कांचनगंगा जॉर्ज बँड आणि जो ब्राऊन यांनी प्रथमच सर केले.
१९६१ : अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडीने ''दशक संपायच्या आत चंद्रावर माणूस'' पाठवण्याची घोषणा केली.
१९६३ : इथियोपियाची राजधानी अदिस अबाबामध्ये आफ्रिकन एकता संघटनेची स्थापना.
१९७७ : चिनी सरकारने विल्यम शेक्सपिअरच्या साहित्यावरील बंदी उठवली. सुमारे १० वर्षे ही बंदी अमलात होती.
१९७९ : अमेरिकन एरलाइन्स फ्लाइट १९१ हे डी.सी.१० जातीचे विमान शिकागोच्या ओहेर विमानतळावरून निघाल्यावर कोसळले. जमीनीवरील दोघांसह २७३ ठार.
१९८१ : सौदी अरेबियाची राजधानी रियाधमध्ये अखाती सहकार समितीची स्थापना.
१९८२ : फॉकलंड युद्ध आर्जेन्टिनाने युनायटेड किंग्डमची युद्धनौका एच.एम.एस. कोव्हेन्ट्री बुडवली.
१९८५ : बांगलादेशमध्ये वादळ. १०,०००हून अधिक ठार.
१९९२ : विख्यात बंगाली साहित्यिक सुभाष मुखोपाध्याय यांना १९९१ चा ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर.
१९९५ : बॉस्नियाच्या सर्ब सैन्याने ७२ तरुणांना ठार मारले.
१९९७ : सियेरा लिओनमध्ये उठाव. मेजर जॉन पॉली कोरोमाहने सत्ता बळकावली.
१९९९ : सुमारे १०० वर्षांपासून पंढरपूरला येणार्या लाखो वारकर्यांची आणि नागरिकांची सेवा केलेल्या पंढरपूर-कुर्डुवाडी या नॅरोगेज रेल्वेला निरोप देण्यात आला.
२००१ : कॉलोराडोतील बोल्डर शहराचा एरिक वाइहेनमायर हा एव्हरेस्ट सर करणारा प्रथम अंध व्यक्ती ठरला. त्याच्या बरोबरचा न्यू कनान, कॉनेटिकटचा शेरमान बुल सगळ्यात वयस्कर व्यक्ती (६४ वर्षे) ठरला.
२००२ : चायना एरलाइन्स फ्लाइट ६११ हे बोईंग ७४७ जातीचे विमान तैवानच्या सामुद्रधुनीत कोसळले. २२५ ठार.
२००२ : मोझाम्बिकच्या तेंगा शहराजवळ रेल्वे गाडीला अपघात १९७ ठार.
२००३ : नेस्टर कर्चनर आर्जेन्टिनाच्या राष्ट्राध्यक्षपदी.
२००३ : चिली देशाने पहिल्यांदा टेनिसचा विश्वकप जिंकला.
२०११ : द ओपराह विन्फ्रे शो चा शेवट करण्यात आला. ओपराह विन्फ्रे यांनी हा शो पंचवीस वर्ष चालवला होता.
२०१२ : स्पेसएक्स ड्रॅगन हे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकांसह यशस्वीरित्या एकत्र येणारे पहिले व्यावसायिक अंतराळयान ठरले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४५८ : महमुद बेगडा, गुजरातचा सुलतान.
१७१३ : जॉन स्टुअर्ट, युनायटेड किंग्डमचा पंतप्रधान.
१८०३ : राल्फ वाल्डो एमर्सन, अमेरिकन लेखक व तत्त्वज्ञानी.
१८३१ : ब्रिटिश हवामानशास्त्रज्ञ सर जॉन इलियट यांचा जन्म. (मृत्यू: १८ मार्च १९०८ व्हार, फ्रान्स)
१८७८ : ब्रिटीश कालीन भारतातील थोर राष्ट्रवादी लेखक, पत्रकार, संपादक आणि राजकीय कार्यकर्ते रामकृष्ण पिल्लई यांचा जन्मदिन.
१८८६ : क्रांतिकारक रास बिहारी घोष यांचा जन्म. (मृत्यू: २१ जानेवारी १९४५)
१८९५ : इतिहासकार व लेखक त्र्यंबक शंकर शेजवलकर यांचा जन्म. (मृत्यू: २८ नोव्हेंबर १९६३)
१८९९ : स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारक, बंगाली कवी काझी नझरुल इस्लाम यांचा जन्म. (मृत्यू: २९ ऑगस्ट १९७६)
१९२६ : गुजराती साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय कादंबरीकार, नाटककार आणि अनुवादक धीरुबेन गोरधनभाई पटेल यांचा जन्मदिन.
१९२७ : अमेरिकन लेखक रॉबर्ट लुडलुम यांचा जन्म. (मृत्यू: १२ मार्च २००१)
१९३३ : त्रिनिदाद आणि टोबॅगो देशाचे माजी पंतप्रधान बासदेव पांडे यांचा जन्मदिन.
१९४६ : सेवानिवृत्त भारतीय क्रिकेटपटू बिशन सिंह बेदी यांचा जन्मदिन.
१९५४ : रतीय अभिनेता, निर्माता आणि राजकारणी मुरली यांचा जन्म. (मृत्यू: ६ ऑगस्ट २००९)
१९७० : मॉरिस क्रॉफ्ट, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१९७२ : भारतीय अभिनेता, दिग्दर्शक, निर्माता आणि पटकथालेखक करण जोहर यांचा जन्म.
१९७४ : विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रांतील शांती स्वरूप भटनागर पुरस्कार तसचं, इन्फोसिस पुरस्कार सन्मानित प्रख्यात शिकागो विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागाच्या प्राध्यापक मुळ भारतीय वंशीय यमुना कृष्णन यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९५४ : आधुनिक भारतीय व्यायामविद्येचे प्रवर्तक, कन्या आरोग्य मंदिरा चे संस्थापक गजानन यशवंत ताम्हणे तथा माणिकराव यांचे निधन. (जन्म: ३१ डिसेंबर १८७८)
१९७४ : स्वतंत्र संयुक्त ओडिशा राज्याचे आर्किटेक्ट(रचनाकार) महाराजा सर कृष्णचंद्र गजपती नारायण देव यांचे निधन.
१९९८ : लक्ष्मीकांत-प्यारेलाल या जोडीतील संगीतकार लक्ष्मीकांत शांताराम कुडाळकर यांचे निधन. (जन्म: ३ नोव्हेंबर १९३७)
१९९९ : डॉ. बी. डी. टिळक, संचालक पुण्याची राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा.

# राष्ट्रीय महामार्ग बनले मृत्युचे सापळे

## अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील भेगा , अपघातात निमंत्रण ; केंद्रीय मंत्र्यांना तक्रार

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातुन जाणारे राष्ट्रीय महामार्ग वाहनचालकांच्या मृत्युचे सापळे बनले असुन अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी महामार्गावरील मांजरसुंभा ते धायगुडा पिंपळा दरम्यान येळंब घाट याठिकाणी निकृष्ट दर्जाच्या कामामुळे जागोजागी भेगा पडल्या असुन दुचाकी वाहनांचे चाक फसुन अपघातांचे प्रमाण वाढले आहे यात अनेकांना कायमचे अपंगत्व आलेले आहे तर काही जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. रस्त्यावरील खड्डे ,तडे आणि भेगा अपघातास निमंत्रण देत आहे . संबंधित काम एचपीएम इन्फ्रा एल एल पी कंपनीकडून करण्यात आले असुन सततच्या अपघातांमुळे राष्ट्रीय महामार्ग मृत्यूचा सापळा बनला असुन जबाबदार कंपनीवर दंडात्मक कारवाई करून कंपनीला काळ्या यादीत टाकण्यात यावे. पडलेल्या भेगांची थातुरमातुर दुरुस्ती न करता ब्लॉक कट करून दर्जेदार दुरुस्ती करण्यात यावी याप्रकरणी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे आणि जिल्हा प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे.

संबंधित प्रकरणात जबाबदार कंत्राटदार व प्रशासकीय आधिका-यांवर कारवाई करण्यात यावी अशी तक्रार सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर , महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ कार्यकारी अभियंता मुंबई यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे. अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी या मार्गाचे काम कालावधी पूर्ण होऊनही गेल्या ६ वर्षांपासून अद्याप रखडलेल्या अवस्थेत आहे. एकुण १७० किलोमीटर लांबी असलेल्या महामार्गाची एकुण किंमत ८७९ कोटी रुपये आहे.राष्ट्रीय महामार्ग विभागाने ठेकेदारांच्या हितासाठी सदर रस्त्याचे तीन टप्पे करून तिन वेगवेगळ्या कंपन्यांना काम दिलेले आहे. अर्धवट रस्ता, खड्डे आणि पुर्ण झालेल्या कामाच्या ठिकाणी पुन्हा खड्डे पडले आहेत.चुंबळी फाटा ते मांजरसुंभा १६६ कोटी रूपयांचे काम (एचसीपीएल) ; मांजरसुंभा ते धायगुडा पिंपळा ३९५ कोटी रूपयांचे काम (एचपीएम इन्फ्रा एल एल पी कंपनी) आणि धायगुडा पिंपळा ते अहमदपूर ३१८ कोटी रूपयांचे काम ( सत्यसाईबाबा कंपनी लातुर) यांच्या मार्फत करण्यात येत आहे. बहुतांश कामे अंदाजपत्रकाला फाटा देऊन संथगतीने कामे केल्याने रखडलेल्या अवस्थेत आहेत. कामे पूर्ण होण्यापूर्वीच जागोजागी रस्ते उखडले आहेत, खड्डे,भेगा पडलेल्या आहेत.आणि दुरुस्तीची कामे थातुरमातुर करण्यात येत असुन पडलेल्या भेगा डांबर टाकून बुजवण्याचे प्रकार करण्यात येत आहेत. कंत्राटदार यांच्यावर राष्ट्रीय महाप्राधिकरण आणि जिल्हा प्रशासन मेहेरबान असल्याने रस्त्यांची दुरावस्था झाली आहे.







**राष्ट्रीय महामार्गावर कागदोपत्रीच वृक्षलागवड :** अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरण आणि विस्तारीकरण करताना ४०-५० वर्षापुर्वीची वड,पिंपळ, कडुनिंब या वटवृक्षाची कत्तल करण्यात आली. नियमानुसार तोडण्यात आलेल्या वृक्षाच्या ५ पट झाडे रस्त्याच्या दुतर्फा लावणे बंधनकारक असताना मांजरसुंभा ते अंबेजोगाई दरम्यान एचपीएम कंपनीने सुरूवातीला काही ठिकाणी वृक्षलागवड केल्याचे नाटक फोटो सेशन करण्यापुरतेच केले परंतु त्याचे संगोपन करण्यात आले नसुन सध्या एकही झाड अस्तित्वात दिसत नाही.मात्र वृक्षलागवड, वृक्ष संगोपन आणि उन्हाळ्यात टँकरने पाणी दिल्याची बिले मात्र नियमित उचलण्यात आल्याचे दिसून आले आहे.त्यामुळे याठिकाणी वृक्षांची लागवड आणि संगोपण करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे.

### दुभाजक, पथदिवे, नाल्यांची कामे अर्धवट

महामार्गाचे काम सुरू होऊन ६ वर्षांपेक्षा कालावधी लोटला असुन अद्याप काही ठिकाणी दोन रस्त्यांमधील दुभाजक,अपुर्णच आहे काही ठिकाणी पुलांचे तर बहुतांश ठिकाणी नाल्यांची कामे अपूर्ण अवस्थेत आहेत तसेच सुरु कामाच्या ठिकाणी दिशादर्शक फलक,बरीकेट्स लावण्यात आलेली नाहीत त्यामुळे अपघातांच्या घटनेत वाढ झाली आहे त्यामुळे कासवगतीने चालणारे काम एचपीएम कंपनीने तातडीने पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## थोडक्यात

### बाबासाहेब शेंडगे यांचे निधन



माजलगाव : शहरापासुन जवळच असलेल्या पुनर्वसित शेलापुरी या गावचे रहिवाशी असलेले माजी सैनिक बाबासाहेब भिवराव शेंडगे वय ८५ व वर्षे यांचे वृध्दापकाळाने दि. २३ मे गुरूवार रोजी दुःखद निधन झाले. बाबासाहेब शेंडगे यांनी भारतीय सैन्यदलात सोळा वर्षे देशसेवा केली असुन जम्मु काश्मिर,नागालँड येथे कर्तव्य बजावले आहे.त्यांच्या पार्थीवावर मंगलनाथ स्मशानभुमीत दि.२४ मे शुक्रवार रोजी सकाळी ८:३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा,एक मुलगी, सुन,नातवंडे असा परिवार आहे. पूर्णवादी बँकेचे व्यवस्थापक तात्यासाहेब शेंडगे यांचे ते वडील होत.

### शिवशंकर काटकर यांचे निधन



शिवशंकर नागनाथ काटकर (वय ५३ वर्ष) यांचे गुरूवारी (दि.२३ रोजी) छ.संभाजीनगर येथील सिगमा हॉस्पिटल ला दीर्घ आजाराने निधन झाले. शुक्रवारी सकाळी ८.३० वा. त्यांचा समाधीविधीचा कार्यक्रम शोकाकुल वातावरणात दिंद्रुड येथील शेतात करण्यात आला. त्यांच्या पश्चात वयोवृध्द आई, तिन भाऊ, पत्नी, दोन मुली एक मुलगा असा परिवार आहे, डॉ. सोमेश्वर काटकर, उद्योजक सुनील काटकर यांचे ते बंधू होत.

### मसुबाई मुसळे यांचे निधन



मसुबाई राजाराम मुसळे (वय ६५ वर्ष) यांचे दीर्घ आजाराने गुरुवारी रात्रौ छत्रपती संभाजीनगर येथील खासगी रुग्णालयात निधन झाले.त्यांच्या पश्चात चार मुले,एक मूलगी, नातवंडे असा परिवार आहे. उद्योजक दिपक मुसळे यांच्या त्या आई होत.

### भुजंगराव ढाकणे यांचे निधन



शिरूर : तालुक्यातील फुलसांगवी येथील रहवासी असलेले भुजंग नामदेवराव ढाकणे यांचे गुरुवार दि.२३ मे रोजी रात्री ११:४० वाजला वृद्धपकाळाने निधन झाले असून त्यांच्यावर शुक्रवार दि.२४ मे रोजी सकाळी १० वाजता नातलग सगेसोयऱ्यांच्या आणि गावाकऱ्यांच्या उपस्थिती फुलसांगवी येथील खंडोबाच्या शेतात शोकाकुल वातावरणामध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. त्यांच्या पश्चात सुभाष भुजंगराव ढाकणे, अशोक भुजंग राव ढाकणे, विठ्ठल भुजंगराव ढाकणे असे तीन मुले दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### बापुराव महानोर यांचे निधन



बीड : गेवराई तालुक्यातील शेकटा येथील रहिवाशी बापुराव महानोर यांचे दि. २२ मे बुधवार रोजी सकाळी ९ वापजण्याच्या सुमारास अल्पशः आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८० वर्षे होते. त्यांच्यावर शेकटा येथील स्मशानभूमित दुपारी ३ वाजण्याच्या दरम्यान अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी,तीन मुली, एक मुलगा, सुन नातवंडे असा परिवार आहे. ते पत्रकार भाऊसाहेब महानोर यांचे चुलते होत.

## जटाशंकर मंदिरातील शिवमहापुराण कथेत शिव-पार्वती सोहळा

बीड। प्रतिनिधी

बीड शहरातील जटाशंकर मंदिरात संभाजीनगर येथील कथाकार वसुंधरा पाठक यांच्या शिवमहापुराण कथा ज्ञानयज्ञात गुरूवारी सायंकाळी सात वाजता शेकडो शिवभक्तांच्या उपस्थीतीत शिव-पावर्ती सोहळा पार पडला. या विवाह सोहळ्यांनतर सामुदायीक आरती करण्यात आली.

बीड शहरातील जटाशंकर मंदिरात रविवार १९ मे २०२४ पासुन संभाजीनगर येथील कथाकार सौ.वसुंधरा श्रीपाद पाठक यांच्या शिव महापुराण कथा ज्ञानयज्ञास सुरूवात झाली आहे. दररोज दुपारी ४ ते सायंकाळी ६ यावेळेत शिवमहापुराण कथेस भाविकांची गर्दी होत आहे. गुरूवारी कथाकार वसुंधरा पाठक यांनी समुद्र मंथन कथा, अमृत लक्ष्मी उत्पत्ती, निलकंठेश्वर भगवान ,नर्मदा मय्या उगम ,सती चरित्र, सतीचे यज्ञकुंडात समर्पण, पार्वती जन्म , पावर्ती तपस्या, शिव पावती विवाह कथा सांगीतली. शेकडो भाविकांनी या कथेचा लाभ घेतला. विवाह सोहळ्यांनतर साडेसात वाजता सामुदायीक आरती करण्यात आली. यजनाम गणेश कडेकर, कल्याण मुळे, दिनकर कुलकर्णी यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थीत होते.




### सायकांळी सात वाजता शिवपार्वती सोहळा

जटाशंकर मंदिरात शिवमहापुराण कथेत सायंकाळी सात वाजता शिव-पार्वती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. विवाहाच्या पूर्वसंध्येला सवाद्य शिव वरात काढण्यात आली. ही वरात कथास्थळी येताच भाविकांनी शिव-पावर्तीचे जोरदार स्वागत केले. बृम्हवृंदांच्या उपस्थीतीत मंत्रोच्चारात हा शिव पार्वती विवाह सोहळा पार पडला.या कथेच्या दरम्यान भगवान शिवाची वेशभुषा कु. आर्या मकरंद कुलकर्णी, तर पार्वतीची वेशभुषा कु. ईश्वरी दिनेश लिंबेकर या मुलींनी साकारली होती.

## नॅशनल उर्दू विद्यालयाचा निकाल १०० टक्के

बीड । प्रतिनिधी

शहरातील जुना बाजार भागात असलेल्या नॅशनल उर्दू उच्च माध्यमिक विद्यालयाचा १२ वी बोर्ड परिक्षेचा निकाल १०० टक्के लागला असून शेख दिलरस बानो रशीद विद्यालयात प्रथम आली आहे.

यावेळी दिनांक २१ मे २०२४ रोजी दुपारी १:०० वाजता इयत्ता बारावीचा निकाल ऑनलाईन जाहीर करण्यात आला. यात नॅशनल उर्दू उच्च माध्यमिक विद्यालयाचा १२ वी बोर्ड परिक्षा २०२४ चा निकाल १०० टक्के लागला आहे. यावेळी नॅशनल उर्दू उच्च माध्यमिक विद्यालयातील एकूण ४८ विद्यार्थी बसले होते. सर्व ४८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे. यापैकी ०२ विद्यार्थीनी विशेष प्राविण्य मिळविले. १० विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले तर ३४ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. ०२ विद्यार्थी पास झाले आहेत. यापैकी शेख दिलरस बानो रशीद या विद्यार्थीनीने ७८.८३ टक्के गुण घेत प्रथम क्रमांक मिळविला. सय्यद मिसबाह तसकिन वहिदोद्दीन ७५.३३ टक्के गुण घेत द्वितीय क्रमांक मिळविला तर शेख अदिबा अंजुम रफिक हिने ७४.५० टक्के गुण घेत तृतीय क्रमांक मिळविला. या सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रिंयदर्शनी एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. सिराजोद्दीन देशमुख, संस्थेचे सचिव सुभाषचंद्र सारडा, आणि प्राचार्य सिद्दीकी नवीद यांनी अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## राष्ट्रीय कन्या उच्च माध्यमिक विद्यालयाचा १००% निकाल

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळाच्या वतीने फेब्रुवारी/ मार्च -२०२४ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेचा राष्ट्रीय कन्या उच्च माध्यमिक विद्यालयाचा निकाल १००% लागला. त्यात ७५ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ७५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. कला शाखेतून पवार रोहित सुदाम याने ७३.३३% गुण घेऊन प्रथम क्रमांक,कणसे पूजा गंगाराम हिने ७५.१७% घेऊन द्वितीय क्रमांक, तर अनवडे कृष्णा चंद्रकांत याने ७१. ८३% घेऊन तृतीय क्रमांक मिळवला. तर व्यवसाय अभ्यासक्रम विभागातून सगळे राधा हिने ७९.८३% घेऊन प्रथम क्रमांक, तळेकर सुरेखा हिने ६९ टक्के घेऊन द्वितीय क्रमांक, तर सोलंकर प्रतीक्षा हिने ६८.४८% घेऊन तृतीय क्रमांक मिळवला. संस्थेचे अध्यक्ष ॲड सिराजोद्दीन देशमुख, सचिव सुभाषचंद्र सारडा, आदित्य एज्युकेशन ग्रुपच्या संचालिका आदिती गिलडा तर उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य चौधरी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले .

## शक्तीपीठ महामार्गास विरोध ;बाधित शेतकरी संवाद यात्रेस मोठा पाठींबा

परळी / प्रतिनिधी

पवणार ते पत्रादेवी या शीघ्र दृतगती शक्तिपीठ महामार्ग मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यातून जात असून या महामार्गात अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी जात असल्याने शेतकरी भूमिहीन होणार असल्याने या महामार्गाविरोधात बाधित शेतकरी एकजूट होत असून प्रस्तावित महामार्गावरील अनेक गावांत शेतकरी संवाद यात्रा सुरू करण्यात आली आहे.अंबाजोगाई तालुक्यातील गित्ता येथे संपन्न संवाद यात्रेत शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातूर, धाराशिव जिल्ह्यातून शक्तीपीठ महामार्ग हा प्रस्तावित असून हा मार्ग अत्यन्त सुपीक आणि बागायती जमिनीतून जाणार आहे. त्यामुळे मराठवाड्यातील खूप मोठी बागायत जमीन या महामार्गामध्ये जाऊन कायमस्वरूपी शेतकरी भूमिहीन होणार आहेत.यामुळे पवणार ते पत्रादेवी या शीघ्र दृतगती शक्तिपीठ महामार्गास शेतकरी विरोध करत आहेत.याच अनुषंगाने १३ एप्रिल २०२४ रोजी परळी येथे मराठवाड्यातील बाधित शेतकऱ्यांची विभागीय बैठक संपन्न झाली.या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार शक्तीपीठ महामार्ग बाधित शेतकरी संवाद यात्रा मागील ५ दिवसापासून सुरू करण्यात आली असून या संवाद यात्रेस शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. गुरुवार दि २३ रोजी ही संवाद यात्रा अंबाजोगाई तालुक्यातील गित्ता येथे पोहचली.या ठिकाणी परळी व अंबाजोगाई तालुक्यातील प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गात ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी जात आहेत असे शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या संवाद यात्रा प्रसंगी दासराव हांबर्डे (नांदेड), पोपटराव घाटूळ (परभणी), ॲड गजेंद्र येळकर, कॉ.एड.अजय बुरांडे (जिल्हा अध्यक्ष किसान सभा,बीड) रविंद्र देवरवाडे, प्रशान्त मस्के ,चंदनशिवे सर,अशोक खामकर, बाबासाहेब यशवंत आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी गित्ता, गिरवली, भारज, सायगाव, नांदगाव, चाडगाव आदी गावातील बाधित शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




शक्तीपीठ द्रुतगती महामार्गाच्या नावाखाली शेतकऱ्यांची सुपीक जमीन कवडीमोल भावात संपादित करून कॉर्पोरेट कंपन्यांच्या घशात घालण्याचे काम हे केंद्र आणि राज्य सरकार करत आहे.महामार्गापेक्षा मराठवाड्यातील सिंचनाचा अनुशेष पूर्ण करण्यासाठीचे प्रयत्न होण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या जमिनी विविध कारणांनी संपादित करून शेतकऱ्यांना भूमिहीन करण्याचे कट कारस्थान सरकार कडून सुरु आहे.शक्तिपीठ महामार्ग बाधित शेतकऱ्यांच्या हक्कासाठी अखिल भारतीय किसान सभा सदैव सोबत आहे.

**-अजय बुरांडे,** शेतकरी नेते, बीड

## डॉ.विठ्ठल जाधव यांच्या कविता पाच भाषेत अनुवादित

शिरूर । प्रतिनिधी

हिंदी अनुसंधान प्रसार केंद्र आणि एम.टी.एफ. अनहद (कोलकत्ता) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय कविता उत्सव कालिकत (केरळ) मध्ये आयोजित करण्यात आला होता. तेलगू, कन्नड, हिंदी आणि मराठी भाषांतील निवडक कवितांचे सादरीकरण, परिसंवाद कालिकत (केरळ) येथे ता. १८ ते १९ मे रोजी संपन्न झाले. शिरूर कासार येथील कवी डॉ.विठ्ठल जाधव यांनी मराठी कवितांचे सादरीकरण केले. मराठी भाषेचा गोडवा प्रस्तुत केला.

भाषा कोणतीही असो तेथील भूमीचे प्रश्न साहित्य लेखनात येत असतात. मराठी, तेलगू, कन्नड, मल्याळम्, हिंदी या भाषा भगिनी आहेत. मराठी साहित्य इतर भाषेत अनुवादित होण्यासाठी डॉ.विठ्ठल जाधव यांच्या दहा कवितांची निवड झाली आहे. भारत हा देश विविध सांस्कृतिक आभूषणांनी नटलेला आहे. वैशिष्ट्यपूर्ण प्रांत, भाषा, वेशभूषा आणि सांस्कृतिक वारसा लाभलेल्या देशात साहित्यिक देवाणघेवाण होते. इतर भाषांतील निवडक साहित्य मराठी भाषेत अनुवादित होते. तसे मराठी भाषेतील साहित्य इतर भाषांत अनुवादित होण्यासाठी या दोन दिवसीय राष्ट्रीय उत्सवाचे आयोजन केरळमध्ये करण्यात आले होते. संतसाहित्य, लोककला यांचाही स्पर्श या उत्सवात झाला. डॉ. जाधव यांनी कॅलिकट (केरळ) राष्ट्रीय कविता महोत्सवात काव्यरचना सादर केल्या. 'माय आणि माती' व 'नवा फटका' कवितांनी अन्य भाषिकांचे लक्ष वेधले. भारीच साड्या, रंगीत माड्या बसायला गाड्या, आल्यात हो वळखीला कार्ड, दारात गार्ड टेंडरला वार्ड, आलेत हो.

या ओळींनी वाहवा मिळवली. उपेक्षितांचे जगणे कवितांमधून अधोरेखित केले. त्यास उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. महाराष्ट्रातील मराठी कवी देविदास फुलारी (नांदेड), बापु दासरी, कवी महेश मोरे, सुनील गायकवाड, डॉ. संजय बोरूडे, रचना गोस्वामी, आशा डांगे, मनिषा पाटील यांनी सहभाग नोंदविला. स्टिव्हन कुट्टी (प.बंगाल), सुखदेव सिंह (पंजाब) विमलेस त्रिपाठी(कर्नाटक ) यांचेसह भारतातील आघाडीचे कवी सहभागी झाले. तर संजीवनी जेधे, प्रकाश राजगुरू, गणेश जेधे, शांता तावरे, महेश निर्मळ यांचेसह अनेकांची उपस्थिती होती.




**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१४७/२०२४**

**गायके श्रीकृष्ण बबन विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय सौंदाना ता.जि.बीड**

**पहा**

**१. गायके श्रीकृष्ण बबन रा.सौंदाना ता.जि.बीड.**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत दाजी सुर्यभान गायके यांचा दिनांक २२/०६/१९२० रोजी मृत्यू झालेला असुन त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास सौंदाना ता.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे सौंदाना ता. जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २२/५/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २४/६/२०२४ ही आहे.

**मार्फत** **ॲड.मिलींद उबाळे**

**स्वाक्षरित/-** **तहसिलदार, बीड**

cmyk

राज्य लोकतंत्र

शनिवार दि.२५ मे २०२४



# पाणीप्रश्नावर शिवसंग्राम आक्रमक

## बीड शहरातील हद्दवाढ वसाहतीमध्ये तात्काळ टँकर सुरू करा –सुहास पाटील, शेषेराव तांबे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील पाणी टंचाई व पिण्यासाठी नळाला नियमीत पाणी पुरवठा सुरळीत करण्यात यावा तसेच बीड शहरातील हद्दवाढ वसाहतीमध्ये पाणी टँकर तात्काळ सुरू करण्यात यावे यासंदर्भात शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या मार्गदर्शनाखाली शहर शिवसंग्रामच्या वतीने बीड नगरपालीका प्रशासन व जिल्हा प्रशासनास निवेदन सादर करण्यात आले.याप्रसंगी शिवसंग्रामचे शहराध्यक्ष सुहास पाटील,उपशहराध्यक्ष शेषेराव तांबे तथा शहर शिवसंग्रामचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

यावर्षीचा उन्हाळा अधिक तीव्र जाणवत आहे. ४० ते ४२ डिग्री सेल्सिअस तापमानापर्यंत नोंद झाली आहे.त्यामुळे उन्हाची दाहकता अधिक तेज होत आहे.बीड नगरपालिका प्रशासन नागरी सुविधाकडे दुर्लक्ष करत आहे.उन्हाळ्यामध्ये पाण्याची गरज जास्त असते.याचे योग्य नियोजन करून सर्वांना पाणी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी बीड नगरपालिका प्रशासनाची आहे तसेच बीड शहरातील हद्दवाढ झालेल्या वसाहतीमध्ये पाण्याचे टँकर तातडीने सुरू करण्याची गरज आहे.बीड शहरातील पाणी हे जास्त दाबाने सोडण्यात यावे तसेच ते पंधरा दिवसांनी ''न '' सोडता आठवड्याला पाणी सोडण्यासंबंधीचे निवेदन आज नगरपालिका प्रशासन व उपजिल्हाधिकारी



बीड यांना शिवसंग्रामच्या वतीने सादर करण्यात आले. सर्वसामान्यांचे प्रश्न सुटले पाहिजेत यासाठी शिवसंग्राम या सामाजिक संघटनेची स्थापना केली असे वेळोवेळी शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष लोकनेते स्व.विनायकराव मेटे साहेब नेहमी सांगायचे.त्यांनी निर्माण केलेल्या कार्यकर्त्यांची फळी आज त्यांच्या पाश्चात त्याच जोमानं काम करत आहे . यापूर्वीही शिवसंग्रामच्या वतीने बीड नगरपालिकेवर प्रशासनाला धडकी भरवणारा हंडा मोर्चा काढण्यात आला. त्यानंतर बीड शहरातील पाणीपुरवठा सुरळीत झाला होता परंतु यावर्षी दुष्काळाची झळा अधिक तिव्र जाणवत आहे . तसेच उन्हाची तीव्रता ही अधिक वाढलेली आहे . खऱ्या अर्थाने पाण्याची खरी जास्तीची गरज सध्या जाणवत आहे . परंतु याकडे दुर्लक्ष करून नगरपालिका प्रशासन गाढ झोपेत आहे.शिवसंग्रामच्या वतीने काल निवेदन देण्यात आले . लवकरात लवकर पाणी प्रश्नावर पर्याय काढून बीड शहरातील नागरिकांना आठवड्याला पाणीपुरवठा करण्यात यावा.तसेच नगरपालिकेच्या हद्दवाढ वसाहतीमध्ये पाणी टँकर तात्काळ सुरू करण्यात यावे अन्यथा शिवसंग्रामच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा शहर शिवसंग्रामच्या वतीने देण्यात आला.याप्रसंगी शहराध्यक्ष सुहास पाटील,उपशहराध्यक्ष शेषेराव तांबे,वाहतूक आघाडीचे जिल्हाध्यक्ष शेख आबेदभाई,किसान आघाडीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे,शिवसंग्राम नेते नामदेव धांडे,मुकुंद गोरे, सातिराम ढोले,कैलास शेजाळ,अल्पसंख्यांक आघाडीचे नेते शेख अखिलभाई, पेठ बीड विभाग प्रमुख शेख लालभाई,शेख नदीम गणी,सुनील थोरात,कुंदन गायकवाड,श्रीकृष्ण परजणे, हरिचंद्र ठोसर,सोशल मीडियाचे जिल्हाध्यक्ष प्रा.पंडित शेंडगे तथा अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



नेकनुर येथे सदगुरु बंकटस्वामी महाराज यांच्या ८० व्या पुण्यतिथी निमित्त संपन्न झालेल्या काल्याच्या कीर्तनाला उपस्थित राहून डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी बंकटस्वामी महाराज आणि मठाचे अधिपती लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे आशीर्वाद घेतले व भाविक भक्तांशी संवाद साधला. याप्रसंगी स्वर्गीय लोकनेते विनायकराव मेटे साहेबांनी नवीन सभागृहासाठी दिलेला शब्दाची वचनपूर्ती केल्याने आनंद व समाधान होत आहे अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

# संत बंकटस्वामींनी गावागावात वारकरी सांप्रदाय पोहोचवला – माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

संत बंकटस्वामींनी लहानपणापासूनच वारकरी संप्रदायाचा प्रसार आणि प्रचार केला एवढेच नव्हे तर गावागावात भजनाच्या माध्यमातून वारकरी सांप्रदाय पोहोचवण्याचे काम करून लाखो शिष्यगण शिक्षित केल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

नेकनुर येथे संत बंकटस्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या काल्याच्या किर्तन प्रसंगी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर उपस्थित होते यावेळी मठाधिपती लक्ष्मण महाराज मेंगडे, चाकरवाडीचे मठाधिपती महादेव महाराज, ज्ञानेश्वर महाराज मंझरीकर, ह.भ.प. हरिदास जोगदंड, अभिमान महाराज ढाकणे, नाना महाराज कदम, सुरेश महाराज जाधव, अमोल महाराज पवार, दिनेश महाराज काळे, पांडुरंग महाराज शिंदे, मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील, नंदकिशोर मुंदडा, श्रीमती ज्योतीताई मेटे, दिनकर कदम, अरुण डाके, सखाराम मस्के, किशोर पिंगळे, तानाजी कदम, पान ३ वर



# अंबाजोगाई शहरातील स्वच्छता, रस्ते व पाणीपुरवठा नियमित करा –राजकिशोर मोदी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील विस्कळीत झालेला पाणी पुरवठा सुरळीत करणे तथा शहरात अतिशय संथ गतीने होत असलेली रस्त्याची कामे तात्काळ पूर्ण करून नगर परिषदेच्या स्वच्छता विभागाला आलेली मरगळ दुर करून शहरातील स्वच्छतेचा प्रश्न तात्काळ मिटवावा व होणारी नागरिकांची गैरसोय टाळावी या मागणीचे निवेदन तहसीलदार तथा मुख्य प्रशासक नगर परिषद अंबाजोगाई यांना राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांच्या वतीने आज देण्यात आले.



मागील एक ते दोन महिन्यांपासून अंबाजोगाई शहराला होणार पाणी पुरवठा पुर्णपणे विस्कळीत झाला आहे. पाणी पुरवठा विभागाच्या ढिसाळ नियोजनामुळे याचा नाहक त्रास अंबाजोगाई शहर वासीयांना होत आहे.अनेक सामान्य नागरिकांना पाणी विकत घेण्याची पाळी येऊ लागली आहे.यामुळे सामान्य नागरिकांना विनाकारण आर्थीक भुर्दंड सहन करावा लागत आहे. तेव्हा तहसीलदार, पान ३ वर

# पिण्याच्या पाण्यासाठीच्या कित्येक योजना कुचकामी

**नागनाथ वारद । अंबाजोगाई**

मांजरा धरणातून लातूर–बीड–धाराशिव या जिल्ह्याची तहान भागविली जाते हे धरण सध्या मृत साठ्यात आहे तरी या धरणातून अंबाजोगाई शहराला सध्या पंधरा दिवसाला पाणी पुरवठा होतो. साधारणतः एक ते सव्वालाख लोकवस्ती असलेले हे शहर असून प्रामुख्याने आठवडाभर साठवण केलेले पाणी संपल्यानंतर शहर वासियांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण फिरावे लागते. दरवेळी घोषणा केलेल्या पाणी पुरवठ्यासाठीच्या योजना कुचकामी ठरल्या आहेत.

### अंबाजोगाई अजूनही तहानलेलीच !



शहराला पंधरा दिवस किंवा त्यापेक्षा अधिक दिवसाला पाणी पुरवठा होतो ही खरी परिस्थिती आहे. सध्या मोठ्या प्रमाणात उन्हाळा जाणवत असून मांजरा धरणातील सध्या असलेल्या पाणी साठ्या बाबत चौकशी करून नागरिकांना पुरेसा पाणीसाठा उपलब्ध करून देण्याबाबत प्रयत्न केले जातील

विलास तरंगे,प्रभारी मुख्याधिकारी नगर परिषद अंबाजोगाई

या शहरात भीषण पाणी टंचाईला तोंड द्यावे लागते अनेक आंदोलने झाली हंडा मोर्चा झाला स्व.विमल मुंदडा ह्या जिल्हयाच्या पालकमंत्री होत्या शिवाय तत्कालिन नगराध्यक्ष राजकिशोर मोदी हे माजी मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांचे खंदे समर्थक होते या दोघांनी नळ योजने संदर्भात मागणी केल्यानंतर शासनाने किरकोळ निधीव्दारे पाणी पुरवठा योजना सुरळीत करून दिली पण थोड्या फार वर्षात पुन्हा परिस्थिती ' जैसे थे ' झाली परिणामी नेतृत्वाकडूनही म्हणावा तसा पाणीप्रश्न पान ३ वर

# जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी राधेश्याम दातार तर उपाध्यक्षपदी मुन्ना मोटे

**गेवराई । प्रतिनिधी**

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती गेवराई शहरात यावर्षी आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरी करण्यात येणार असून सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी राधेश्याम दातार, उपाध्यक्षपदी मुन्ना मोटे, सचिव म्हणून दादासाहेब चौधरी, सहसचिव राजाभाऊ शेजूळ, कार्याध्यक्ष अशोक गायकवाड, कोषाध्यक्ष राहुल चव्हाण यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी



होळकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी घोषित करताना शांतीलाल नाना पिसाळ, प्रा.गणपत काकडे, जालिंदर अण्णा पिसाळ, फुलचंद काका बोरकर, हभप परमेश्वर महाराज वाघमोडे, गजानन काळे, गणेश शेजूळ, दत्ताभाऊ पिसाळ, गणेश काळे, अनंत पिसाळ, सुनिल पिसाळ यांच्यासह सर्व समाज बांधव उपस्थित होते.

गेवराई शहरात राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त डिजेमुक्त जयंती उत्सव साजरा करण्यात पान ३ वर

# राहुल देशमुख यांच्यावरील खोटे गुन्हे परत घ्या –ॲड. नारायण गोले



**माजलगाव । प्रतिनिधी**

नागपूर जिल्ह्यातील काटोल चे नगराध्यक्ष, शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई राहुल देशमुख यांनी महिलेच्या झालेल्या हत्याबाबत मोर्चा काढण्याची तयारी दर्शवल्याने बिथरलेल्या महाराष्ट्राच्या गृहमंत्र्याने कायदा हातात घेऊन बेकायदेशीरपणे भाई राहुल देशमुख यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करून त्यांना अटक केल्याच्या निषेधार्थ भाई ॲड.नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तहसीलदार माजलगाव पान ३ वर



कडा : यात्रा म्हटली की उंच भरारी घेणारे आकाश पाळणे , मिठाई आणि खेळण्यासह गृहोपयोगी साधनांनी सजलेली विविध दुकाने . अशा आकर्षणाने सज्ज झालेल्या कडा येथील मौलाली बाबांच्या यात्रेचे ड्रोण कॅमेऱ्याने टिपलेले विहंगम दृश्य. छायाचित्र – अंबादास जगताप, कडा

# खरीप हंगामाची तयारी : ४३ अंश तापमानात ; शेतकरी झेलतोय ऊन अन् वारा

**ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव**

तालुक्यात तापमानाचा पारा ४३ अंशांवर पोहोचला.भरदुपारी उन्हात घराबाहेर निघणे कठीण आहे. दुपारच्या सुमारास नेहमी गजबजलेले रस्तेही निर्मनुष्य दिसताय ;मात्र शेतीची कामे आपल्यालाच करावी लागणार, यासाठी जगाचा पोशिंदा शेतकरी रखरखत्या उन्हात ४३ अंशांचा उन्हाचा पारा अंगावर झेलत खरिपातील पेरणीसाठी मशागतीत व्यस्त आहे.

माजलगाव तालुक्यातील ९२ गावांत ६५ हजार हेक्टर भौगोलिक क्षेत्र आहे.त्यापैकी ५७ हजार हेक्टर खरीप पेरणीचे आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही तालुक्याच्या तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.एप्रिलनंतर मे महिन्याच्या प्रारंभी उन्हाचा भडका उडाला आहे. तरीही जगाचा पोशिंदा शेतकरी रखरखत्या उन्हात खरिपातील पेरणीपूर्व मशागतीची कामे करण्यात व्यस्त आहे.गतवर्षी उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झाल्याने शेतकऱ्यांचे वार्षिक बजेट बिघडले आहे.उत्पादन




खर्च वाढला त्या तुलनेत उत्पादन होत नाही. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. निसर्गावर अवलंबून असलेल्या शेतीचे दिवस संपले आहेत.



### पुन्हा नव्या उमेदीने शेतकरी लागला कामाला

उद्याचे स्वप्न डोळ्यात साठवून शेतकऱ्यांची मशागत सुरू आहे. यंदा उत्पादन कमी आणि शेतमालाला दर कमी,अशी अवस्था शेतकऱ्यांची झाली आहे.उत्पन्न खर्च वाढला त्या तुलनेत यंदा शेतीमालाचे दर पडल्याने शेतकऱ्यांच्या पदरी निराशा आली आहे. गतवर्षीचा खरीप हंगाम पूर्णतः वाया गेला होता.परिणामी शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत; परंतु हार न मानता पुन्हा बळीराजा नव्या उमेदीने शेती करायला तयार झाला आहे.

### उन्हाच्या वाढत्या पाऱ्यामुळे रस्ते निर्मनुष्य

माजलगाव तालुक्यात तापमानाचा पारा ४३ अंशांवर गेला आहे.रहदारीने दररोज गजबजलेले रस्तेही निर्मनुष्य झाले आहेत. भरउन्हात घराबाहेर पडणे कठीण झाले आहे.एप्रिल महिन्याच्या अखेरीस तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.आता मे महिन्यात उन्हाचा तडाखा वाढत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# ‘ब्ल्यू नाईल’ ला ‘स्विगी’ चा ५६ लाखांचा चुना!

**देशात सर्वत्र फूड डिलिव्हरी करण्याचे काम करणाऱ्या ‘स्विगी’ या प कंपनीने पुण्यातील ‘ब्ल्यू नाईल’ या हॉटेलची तब्बल ५६ लाख रुपयांची फसवणूक केली आहे; बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल, ग्राहकांकडून जमा झालेले पैसे केले गायब**

पुणे । प्रतिनिधी

देशात सर्वत्र फूड डिलिव्हरी करण्याचे काम करणाऱ्या ‘स्विगी’ या प कंपनीने पुण्यातील ‘ब्ल्यू नाईल’ या हॉटेलची तब्बल ५६ लाख रुपयांची फसवणूक केली आहे. हा प्रकार २६ मार्च ते ७ नोव्हेंबर २०२३ दरम्यान ऑनलाईन पद्धतीने घडला. या प्रकरणी सायबर पोलिसांकडे तक्रार दाखल केली होती. या प्रकरणी आता बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

स्विगी कंपनीचे व्यवस्थापक संदीप शर्मा यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. त्याच्यावर भादवि ४१९, ४२०, ३४ अन्वये गुन्हा नोंदविला आहे. या प्रकरणी ब्ल्यू नाईल रेस्टॉरंटच्या अकाऊंट हेड विद्यागौरी भावकर (वय ५५) यांनी फिर्याद दिली आहे. बंडगार्डन पोलिसांच्या माहितीनुसार, फिर्यादी ‘ब्ल्यू नाईल रेस्टॉरंट’मध्ये अकाऊंट हेड आणि सेक्रेटरी म्हणून १९९१ पासून काम करीत आहेत. गेल्या काही वर्षात ऑनलाईन पद्धतीने खाद्य पदार्थ मागविण्याची पद्धत रूढ झालेली आहे. ग्राहक घरबसल्या तसेच कामाच्या ठिकाणावरूनही खाद्य पदार्थ मागवतात. ब्ल्यू नाईल रेस्टॉरंटमधूनही मोठ्या प्रमाणावर खाद्यपदार्थ ऑनलाईन मागवले जातात. त्याकरिता रेस्टॉरंटने सक्सेस हॉस्पिटॅलिटी, झोमॅटो, स्विगी या ऑनलाईन फूड डिलिव्हरी करणाऱ्या कंपन्यांसोबत संलग्नता (टायअप) केलेली आहे. ब्ल्यू नाईल रेस्टॉरंटकडून पुण्यातील ग्राहकांना या डिलिव्हरी पद्धारे खाद्य पदार्थ पोहोचवले जातात. यातील स्विगी कंपनीसोबत ब्ल्यू नाईलचा २०१५ साली करार झालेला आहे. तेव्हापासून स्विगी कंपनीमार्फत ऑनलाईन खाद्य पदार्थ पाठविण्यास सुरुवात झाली. ब्ल्यू नाईलचे अनेक ग्राहक स्विगीच्या पवरून हव्या असलेल्या खाद्य पदार्थांची ऑर्डर देतात. ही ऑर्डर ब्ल्यू नाईल रेस्टॉरंटद्वारे स्वीकारल्यानंतर स्विगीचे डिलिव्हरी बॉय रेस्टॉरंटमधून पदार्थ घेतात आणि ग्राहकांना देतात. ग्राहकांनी ऑनलाईन अथवा रोखीने दिलेले बिलाचे पैसे स्विगी कंपनीला मिळतात. त्यानंतर कंपनी रेस्टोरंटच्या बँक खात्यावर ‘एनईएफटी’ किंवा ‘आरटीजीएस’द्वारे ट्रान्सफर करते. ही रक्कम जमा करण्याचा कालावधी एक आठवड्याचा म्हणजेच रविवार ते शनिवार असा असतो. हा व्यवहार स्विगी कंपनीचे येथील मॅनेजर संदीप शर्मा पाहात होता.

मार्च २०२३ पासून स्विगीकडून रेस्टॉरंटला मिळणाऱ्या पैशांमध्ये खंड पडू लागला. करारामध्ये ठरल्याप्रमाणे स्विगी कंपनीने रेस्टॉरंटचे पैसे वेळेत दिले नाहीत. रेस्टॉरंटकडून ८ नोव्हेंबर २०२३ पासून स्विगी कंपनीसोबतचे व्यवहार पूर्णपणे थांबवण्यात आले. तसेच, थकीत रक्कम पाठविण्याबाबत मॅनेजर संदीप शर्माला वेळोवेळी फोन, ईमेलद्वारे संपर्क साधून विचारणा करण्यात आली. त्यावेळी त्याने १५ ते २० दिवसांत पैसे जमा होतील असे ईमेलद्वारे कळवले होते. परंतु, अद्याप रेस्टॉरंटचे पैसे जमा झालेले नाहीत. अशाप्रकारे स्विगी कंपनीने ब्ल्यू नाईल रेस्टॉरंटची ५४ लाख ६२ हजार ७८६ रुपयांची थकबाकी न देता तसेच कंपनीचा १ लाख ३७ हजार ९६ रुपयांचा टीडीएस न भरता एकूण ५५ लाख ९९ हजार ८८२ रुपयांची अर्थिक फसवणूक केल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

या संदर्भात तपास अधिकारी तथा पोलीस उपनिरीक्षक परमेश्वर गरकळ म्हणाले, ब्ल्यू नाईल हॉटेलची स्विगी कंपनीमार्फत फसवणूक झाल्याप्रकरणी सायबर पोलिसांकडे तक्रार अर्ज देण्यात आला होता. सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल करून बंडगार्डन पोलिसांकडे वर्ग केला आहे. कंपनीच्या व्यवस्थापकाशी आम्ही संपर्क साधला आहे. याबाबत गुन्हा दाखल झालेले संदीप शर्मा यांच्याशी संपर्क साधला असता, ते म्हणाले की मला गुन्हा दाखल झाल्याबाबत काहीच माहिती नाही. मी स्विगी कंपनीत नोकरी करतो. माझ्यावर गुन्हा दाखल होण्याचे कारण समजले नाही. याविषयी मी माहिती घेऊन बोलेन, असे ते म्हणाले.

# पुणे जिल्ह्यातील ११ तालुक्यांमध्ये टँकरद्वारे पाणी; मावळ, मुळशी तालुका सुरुवातीपासून टँकरमुक्त

पुणे । प्रतिनिधी

मराठवाडा, विदर्भात दुष्काळाच्या तीव्र झळा बसत आहेत. अनेक सुरुवातीपासून पाण्याची भीषण टंचाई भासत आहे. मात्र आता ही पाणी टंचाई पुणे जिल्ह्यात देखील दाखल झाली आहे. मागील अनेक दिवसांपासून जिल्ह्यातील टँकरद्वारे पाणी पुरवले जात आहे. पुणे जिल्ह्यातील ११ तालुक्यांमधील १७८ गावे आणि ३१६ वाड्या वस्त्यांना टँकरद्वारे पाणी पुरवले जात आहे.




पुरंदर तालुक्यातील सर्वाधिक ४० गावांना दुष्काळाने ग्रासले आहे. तालुक्यातील शेकडो वाड्या वस्त्यांचा देखील दुष्काळात समावेश आहे. तालुक्यातील एक लाख सहा हजार ८८१ लोक टँकरच्या पाण्यावर अवलंबून आहेत. याच भागात ७४ हजार ३३६ जनावरे असून ती देखील टँकरच्या पाण्यावर अवलंबून आहेत.

दुष्काळात दुसऱ्या क्रमांकावर आंबेगाव तालुका आहे. तालुक्यात २९ गावे आणि १५८ वाड्या वस्त्यांना २३ टँकरद्वारे पाणी पुरवले जात आहे. तालुकानिहाय पाणी टंचाई असलेल्या गावांना पाणी पुरवठा करण्यासाठी ठराविक खासगी विहिरी आणि विंधन विहिरी (बोअरवेल) राखीव ठेवण्यात आल्या आहेत. पुरंदर तालुक्यात ८७ टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. त्यापाठोपाठ बारामती २८, हवेली २६, आंबेगाव २३, जुन्नर २० तर इंदापूर तालुक्यातील दुष्काळी भागात १९ टँकरद्वारे पाणी पुरवले जात आहे. खेड तालुक्यात १४, शिरूर १२, दौंड १०, भोर ९, वेल्हे तालुक्यात ४ टँकर सुरु आहेत. पुणे जिल्ह्यातील मावळ आणि मुळशी तालुक्यातील एकाही गावाचा अथवा वाडी वस्तीचा दुष्काळाच्या यादीत समावेश नाही. त्यामुळे या दोन तालुक्यांमध्ये एकही सरकारी टँकरचा पाणीपुरवठा होत नाही.

# पुण्यात ५० पब आणि हॉटेलवर कारवाई केल्यानंतर मालक, कर्मचाऱ्यांचे आंदोलन; पब बंद झाले तर काय करणार?

पुणे । प्रतिनिधी

पुणे पोर्शे कार अपघातप्रकरणातील बिल्डर विशाल अग्रवालच्या मुलाने मित्रांसोबत पबमध्ये जाऊन दारू ढोसली होती. विशेष म्हणजे येथील कर्मचारी आणि मॅनेजर हे सर्रास अल्पवयीन मुलांना दारू देत असल्याचे यानंतर उघड झाले होते. नंतर त्याने भरधाव कार चालवून तरूण-तरूणीचा जीव घेतला होता. यामुळे देशभरात संताप व्यक्त होत आहे. रात्रभर चालणाऱ्या या बेकायदेशीर पब आणि हॉटेलांवर पुणे महापालिका आणि प्रशासनाने कारवाई करून ५० हॉटेल्स बंद केली. यानंतर आता पबचे मालक आणि कर्मचारी पोटाच्या काळजीने रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत.




या कारवाईनंतर बार मालक आणि कामगारांनी पब बंद करण्याच्या प्रशासनाच्या कारवाईलाविरोध केला आहे. त्यांनी पुण्यातील राजा बहादूर मिल येथे रस्त्यावर आंदोलन केले. ज्या पबमध्ये फालतू धंदे चालतात ते पब बंद करा, सगळे पब बंद केले तर घर चालवायला पैसे कुठून आणणार, ही कारवाई चुकीची असल्याचे हे कर्मचारी आणि मालक म्हणत आहेत.

पुण्यात रस्त्यावर उतरलेले हे पब, बार, रेस्टॉरंट चालक मालक शांततेत आंदोलन करत आहेत. या सर्व पब आणि हॉटेल्समध्ये साधारण अडीच हजार कामगार काम करतात. आमच्यावर उपासमारीची वेळ आल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून मागील तीन दिवसात १४ पथकांमार्फत राबविण्यात आलेल्या धडक मोहिमेत ३२ विविध परवाना कक्ष अनुज्ञप्तीवर गुन्हे दाखल

पुणे । प्रतिनिधी

कल्याणीनगर पुणे येथील अपघाताच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाकडून मागील तीन दिवसात १४ पथकांमार्फत राबविण्यात आलेल्या धडक मोहिमेत ३२ विविध परवाना कक्ष अनुज्ञप्तीवर गुन्हे दाखल केले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार या अनुज्ञप्तींचे व्यवहार तात्काळ प्रभावाने बंद ठेवण्यात आले असून सर्व अनुज्ञप्ती सील करण्यात आलेल्या आहेत.

या कारवाईत १० रूफटॉप, अंदाजे १६ पब, इतर ६ परवाना कक्ष बार अशा एकूण ३२ अनुज्ञप्तींचे व्यवहार तात्काळ प्रभावाने बंद ठेवण्याचे आदेश पारित केले असून सर्व अनुज्ञप्ती सील करण्यात आलेल्या आहेत. जिल्हाधिकारी, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त, उपआयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे जिल्ह्यात धडक मोहिम राबविण्यात येत आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागांकडून वारंवार अनुज्ञप्तींच्या गैरव्यवहाराबाबत कारवाई करण्यात येते. कोझी बारवर आता अनुज्ञप्तीचे व्यवहार बंद केल्याची कारवाई केलेली असली तरी दोन महिन्यापूर्वीही राज्य उत्पादन शुल्क विभागाने विभागीय गुन्हा नोंद केलेला आहे.

२०२३-२०२४ मध्ये राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाकडून एकूण २९७ अनुज्ञप्तीवर विविध कारणांसाठी गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये १ कोटी १२ लाख रुपये इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे. १७ अनुज्ञप्तींवर निलंबनाची कारवाईदेखील करण्यात आली असून २ अनुज्ञत्या कायमस्वरुपी बंद करण्यात आल्या आहेत.

एप्रिल २०२४ पासून आजतागायत ५४ अनुज्ञप्त्यांवर गुन्हे नोंद करण्यात आलेले

असून ५ लाख रुपये इतका दंड वसुल केलेला आहे. यात एकूण ३२ अनुज्ञप्त्या सील करण्यात आलेल्या आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभाग नियोजनबद्ध कारवाई करीत असून अनुज्ञप्ती विहीत वेळेनंतर सुरू ठेवणे, अल्पवयीन मुलांना मद्यविक्री करणे, अवैध ठिकाणांवर (रुफटॉपवर) मद्यविक्री करणे या बाबत सर्व पथकांकडून तपासणी मोहिम सुरू आहे.

विभागाकडे मद्यसेवन परवाने मुबलक प्रमाणात उपलब्ध असून ऑनलाईन पद्धतीनेही exciseservices.mahaonline.gov.in या संकेतस्थळावरून देखील मद्यपरवाने देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. वरील गैरव्यवहारासंदर्भात नागरिकांच्या तक्रारी असल्यास टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९ किंवा व्हॉटसअप क्रमांक ८४२२००११३३ वर तक्रार देण्याचे आवाहान राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या आयुक्तांनी केले आहे.

# युट्यूबर्सच्या क्षेत्रात आव्हाने आहेत; मात्र चिकाटी सातत्य असल्यास यश नक्की

पुणे : कंटेन्ट क्रिएटर-युट्यूबर्सच्या क्षेत्रातही आव्हाने आहेत. मात्र सातत्य, चिकाटी आणि शिकण्याची वृत्ती असल्यास यश-पैसा नक्की मिळू शकतो, असा विश्वास मराठी भाषेतील आघाडीच्या युट्यूबर्सनी व्यक्त केला.




अस्पायर नॉलेज न्ड स्किल्स, संवाद पुणे आणि हाऊस ऑफ सक्सेसतर्फे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठचे रिसर्च पार्क फाऊंडेशन, पुणे मॅनेजमेंट असोसिएशन, भावार्थ यांच्या सहकार्याने बालगंधर्व कलादालनात आयोजित तीन दिवसीय नेक्स्ट जेन करिअर फेस्ट प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. पहिल्या दिवसाच्या सायंकाळच्या सत्रात ‘हटके करियर : युट्यूबर्स आणि इन्फ्लुएंसर्सचे’ हा संवादात्मक विशेष कार्यक्रम झाला. यात सुकीर्त गुमास्ते, उर्मिला निंबाळकर, मधुरा बाचल यांचा सहभाग होता. त्यांच्याशी भावार्थच्या व्यवस्थापक कीर्ती जोशी यांनी संवाद साधला. तत्पुर्वी ‘दहावी व बारावीनंतरचे करियर’ या विषयावर सुप्रसिद्ध करियर काऊन्सेलर आणि सामाजिक कार्यकर्ते विवेक वेलणकर यांचे व्याख्यान झाले.

सुकीर्त गुमास्ते, उर्मिला निंबाळकर आणि मधुरा बाचल यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात कशी झाली, कुटुंबियांचा पाठींबा कसा मिळाला, काळानुरूप बदल कसे घडत गेले याविषयी मनमोकळा संवाद साधला. या क्षेत्रात यायचे असेल तर सातत्य, तपश्चर्या आणि नवीन करण्याची उर्मी लागते. या क्षेत्रात पेशन्स खूप महत्त्वाचा असतो. आपआपल्या क्षेत्रात आवडीचे काम करत गेल्यास संधी आपोआप मिळत जातात. आपल्याला काय करायचे आहे हे आधी निश्चित करावे लागते. आपल्या आवडीच्या कामातूनच आपल्याला आनंद घेता येतो. ‘मला व्यक्त व्हायचे आहे’ असे वाटणे, कुठला विषय मांडायचे हे शोधणे हे खूप महत्त्वाचे असते, असे त्यांनी सांगितले.

या क्षेत्रात आलो तेव्हा आव्हाने खूप होती. बदलत्या तंत्रज्ञानाचा सातत्याने अभ्यास करावा लागला. टेक्नॉलॉजीप्रमाणे स्वत:लाही अपग्रेड करावे लागले. आपल्या कामाविषयी नशा असेल तर धावणे थांबत नाही. युट्यूबर्सच्या क्षेत्रातील कंन्टेंट ‘किंग’ तर कन्सिटन्सी ‘क्विन’ आहे.

इतर व्यवसायाप्रमाणे या व्यवसायतही धोके आहेत. या क्षेत्रात येण्यापूर्वी आपल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे. पैसा कधी आणि किती मिळेल हे कुणी नक्की सांगू शकत नाही. एकदा तुमचे गुडविल तयार झाले की तुमच्या वाटा प्रशस्त होतात. आपल्या जगणातूनच आपला ब्रँड तयार होत असतो, असे त्यांनी उपस्थितांशी संवाद साधताना सांगितले. मान्यवरांचे स्वागत समिधा कान्हे यांनी केले.

# मोशी येथील २५० मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह येथे प्रवेश प्रक्रिया सुरु

पुणे । प्रतिनिधी

मोशी पिंपरी-चिंचवड येथील २५० मागासवर्गीय मुलांच्या शासकीय वसतिगृहात २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली असून इच्छुकांकडून प्रवेशासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत.

वसतिगृहात इयत्ता ११ वी व पुढील शिक्षण घेवू इच्छिणाऱ्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग, खुला प्रवर्ग, अपंग, अनाथ प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासनाने निर्धारित केलेल्या टक्केवारीच्या अधिन राहून रिक्त जागांवर प्रवेश देण्यात येणार आहेत. वसतिगृहात १५० विद्यार्थ्यांची क्षमता असून प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना विनामूल्य निवास, अंथरूण, पांघरुण, भोजन, पुस्तके, स्टेशनरी, शैक्षणिक बाबींकरीता आर्थिक सहाय्य, दरमहा ८०० रूपये निर्वाह भत्ता, ग्रंथालय आदी सुविधा पुरविण्यात येणार आहे.

सन २०२४-२५ या वर्षात वसतिगृहाच्या प्रवेशासाठी प्रवेश प्रक्रिया सूरू असून दहावी, बारावी व इतर अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेचा निकाल लागल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवसापासून प्रवेश अर्ज वाटप वसतिगृहाच्या कार्यालयामध्ये सुरू होत आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या अंतिम परीक्षेचा निकाल घेवून अर्ज नेण्यासाठी व अधिक माहितीसाठी २५० मुलांचे शासकीय वसतिगृह, मोशी पिंपरी-चिंचवड येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन वसतिगृहाचे गृहपाल यांनी केले आहे.

# विविध मागण्यांसाठी माजी आमदार शरद सोनवणे यांचे बेमुदत उपोषण

आळेफाटा । प्रतिनिधी

जुन्नर तालुक्यात बिबट्यांचे होत असलेले हल्ले रोखण्यासाठी वनविभागाने उपाययोजना कराव्या, बिबट्याला पकडण्यासाठी उपाययोजना न करता शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल करणाऱ्या उपवनसंरक्षक अमोल सातपुते याचे तात्काळ निलंबन करावे, या मागणीसाठी जुन्नरचे माजी आमदार शरद सोनवणे यांनी शुक्रवार (दि २४) सकाळी दहा वाजल्यापासून आळेफाटा चौकात बेमुदत उपोषण सुरु केले आहे.



जुन्नर तालुक्यात बिबट्याचा मोठ्या प्रमाणावर वावर आहे. गेल्या चार महिन्यात पूर्व भागातील आळे, कांदळी, काळवाडी, पिंपरीपेंढार शिरोली बुद्रुक येथे बिबट्याचे हल्ल्यात तीन बालके, महिला व तरुण मृत्यूमुखी पडले असून किमान चार ते पाच जण जखमी झाले आहेत. त्यातच पिंपरीपेंढार येथील घटनेनंतर तेथील शेतक-यांवर वनविभागाच्या वतीने गुन्हे दाखल केले आहेत. बिबट्यांचे हल्ले दिवसागणिक वाढत असताना वनविभागाने ठोस उपाययोजना करावी, तसेच जुन्नरचे उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांचे निलंबन करावे, यासाठी माजी आमदार शरद सोनवणे यांनी आजपासून आळेफाटा चौकात उपोषणास सुरुवात केली.

आज सकाळी दहा वाजता त्यांनी चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून उपोषणास सुरुवात केली. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य प्रसन्न डोके, पिंपळवंडी उपसरपंच मयूर पवार, प्रदीप देवकर, संतोष घोरणे, गणेश गुंजाळ, सौरभ डोके, निलेश शिंदे, निलेश भुजबळ, संजय गाढवे, समीर देवकर यांचेसह ग्रामस्थ, शेतकरी व मेंढपाळ मोठ्या संख्येत उपस्थित होते. वनविभागाचा मनमानी कारभार थांबला पाहिजे, शेतकऱ्यांवर दाखल केलेले खोटे गुन्हे मागे घ्या व अमोल सातपुते यांचे निलंबन झालेच पाहिजे, अशा घोषणा यावेळेस देण्यात आल्या.

यावेळी बोलताना प्रसन्न डोके यांनी पिंपरी पेंढार मधील गुन्हे तातडीने मागे घ्यावेत, बिबट्यांचे हल्ले रोखण्यात योग्य नियोजन करत नसल्यामुळे उपवनसंरक्षकांची तातडीने बदली करावी, पकडलेल्या बिबट्यास कॉलर आयडी बसवावी व त्यांची नसबंदी करावी अशी मागणी केली. यावेळी बोलताना माजी आमदार शरद सोनवणे म्हणाले की, जुन्नर तालुक्यात बिबट्यांचे होणारे हल्ले रोखण्यात वनविभाग अपयशी ठरले आहे. यामुळे लहान बालकांसह तरूण व महिला यांना आपले जीव गमवावे लागले आहेत. याउलट पिंपरीपेंढार येथील घटनेनंतर तेथील शेतकऱ्यांवरच तालुक्याचे लोकप्रतिनिधी यांना न विचारता गुन्हे दाखल केले. या सर्व घटनांना जबाबदार असलेल्या वनविभागाचे उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून त्यांचे निलंबन करावे, अशी मागणी करत जलसंपदा विभागाची माणिकडोह येथील बिबट्या निवारण केंद्रालगतची जलसंपदा विभागाची जागा तातडीने संपादित करून तेथे अधिकचे बिबटे ठेवण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, आंबेगाव तालुक्यात नेलेले वनविभाग कार्यालय तातडीने पुन्हा नारायणगाव येथे सुरू करावे. तसेच तातडीने बिबट्यास जेरबंद करण्यासाठी पिंज-याची संख्येत वाढ करावी, या मागण्यांची तातडीने दखल न घेतल्यास उपोषण मागे घेणार नसल्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

# पुणे पोर्शे अपघातातील आरोपी पूर्णपणे शुद्धीत होता - पुणे पोलीस आयुक्त

पुणे । प्रतिनिधी

पोर्शे अपघातातील अल्पवयीन आरोपीला दारूच्या नशेत काही कळतच नव्हतं हे खोटं आहे. आरोपी पूर्णपणे शुद्धीत होता, असा आमचा युक्तीवाद आहे. त्या रात्रीच सर्व सीसीटीव्ही फुटेज आम्हाळा मिळाले आहे. गाडी आरोपी चालवत नव्हता तर चालक चालवत होता, असा बनाव रचण्याचा प्रयत्न केला गेला. परंतू घटनेचा संपूर्ण क्रम आमच्या लक्षात आला आहे. त्यामुळे आरोपीला लवकरात लवकर शिक्षा मिळेल यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत, असे पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितले.



आरोपीला पिझ्झा, बर्गर दिल्याच्या आरोपात तथ्य नसल्याचेही यावेळी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले. अमितेश कुमार म्हणाले की, आरोपीचे ब्लड रिपोर्ट आतापर्यंत प्राप्त झालेले नाहीत. ब्लड रिपोर्टवर ही केस अवलंबून नाही. कलम ३०४ लावण्यासाठी उशीर का लावला, याची चौकशी सुरू आहे. कलम ३०४ नुसार गुन्हा सिद्ध झाला तर आरोपीला १० वर्षापर्यंत शिक्षा होऊ शकते. आवश्यक ते पुरावे गोळा करण्याचे काम सुरू आहे. गाडीमध्ये ४ लोक होते तर पबमध्ये पार्टीत आणखी ७ ते ८ जण आले होते, हे तपासात दिसून आले आहे. दारूमुळे आरोपीला काही कळतच नव्हत हे खोटं आहे. आरोपी पूर्णपणे शुद्धीत होता, हा आमचा युक्तीवाद आहे. त्या रात्रीच सर्व सीसीटीव्ही आमच्याकडे आहे. कृतीचा काय परिणाम होईल याचं ज्ञान आरोपीला होते. घटनेनंतर आरोपीने गाडी चालक चालवत होता हे भासवण्याचा प्रयत्न केला, असेही त्यांनी सांगितले.

दोन एफआयआर असण यात काही गैर नाही. आम्ही दोन्ही केसवर तापस करत आहे. ही घटना घडल्यानंतर सकाळी ८ च्या सुमारास गुन्हा दाखल झाला. यानंतर घटनाक्रम कळल्यानंतर ३०४ कलम वाढवण्यात आले. आम्ही ही केस काळजीपूर्वक तपासत आहे. आमचा तपास बारकाईने सुरू असून कोर्टात आमची बाजू ताकदीने मांडणार आहे. तपासादरम्यान कुणाचाही दबाव नाही. सर्व बाबतील क्राईम ब्रँचकडून तपास सुरू आहे. आरोपीला लवकर शिक्षा मिळेल यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे पोलिसांकडून दिरंगाई झाली किंवा पोलिसांवर दाबाव टाकला जात आहे, असा आरोप उचित नसल्याचेही अमितेश कुमार म्हणाले.